



# छात्र प्रबोधन

सौर चैत्र, शके १९४२ । वर्ष २० अंक ७।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष २८ अंक ९)
वार्षिक वर्गणी ₹ २००। मूल्य ₹ २०। पृष्ठे ३६

## वासंतिक विशेषांक

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!



या पद्याची
चाल ऐका
आणि पद्य म्हणा!

# स्वप्न उद्याच्या उजळ दिसांचे...

नजरेपुढती वाटा खडतर हाताशी केवळ निर्धार
स्वप्न उद्याच्या उजळ दिसांचे जिद्दीने करूया साकार ।। धृ. ।।

अजुनी अंधाराच्या डोही खोल बुडाले दिवे किती
गाळामध्ये कितीक रुतली चाके त्यांची नाहि मिती
परिस्थितीचे शाप असे हे कधी न रोखू मज शकणार ।। १ ।।

पिढ्यापिढ्यांचा नसे वारसा, नसती नमुने वा आधार
मनी भूक मोठ्याच यशाची मनात केवळ हाच विचार
मोह भोवती कितीही असु दे नेइन माझी नैय्या पार ।। २ ।।

माझ्याशिच स्पर्धा ही माझी, समाधान आनंद मनी
कुणी दिलेल्या आधाराची जाणिव हृदयी क्षणोक्षणी
उभी पाठिशी मूक माऊली जिने उपसले कष्ट अपार ।। ३ ।।

परिस्थिती घनघोर असू दे, तरी सफलता अपरंपार
कशास डंका, कृतीच बोले, मी माझ्यासम घडविन चार
कृतज्ञतेचा भाव जपूनी यशध्वजा ही फडकवणार ।। ४ ।।

कवी – राम डिंबळे

**पद्याचा भावार्थ :** 'वास्तवाचे भान असेल तर आपल्यातील उणिवा दूर करून जिद्दीने देशाच्या उज्ज्वल 'उद्याचं' स्वप्न साकार करता येईल' हा अतिशय अर्थपूर्ण विचार या पद्यात मांडला आहे.

देशामध्ये प्रगती, विकास होत असला तरी अज्ञान, अन्याय, दारिद्र्य यांचा अंधार येथील खेड्यापाड्यांना वेढून राहिला आहे. समाजातील काही उपेक्षित घटकांना पिढ्यापिढ्यांचा वारसा नाही, म्हणजे त्यांच्या कित्येक पिढ्या अज्ञान, दारिद्र्य, उपेक्षा यांना तोंड देताहेत.

आज ज्यांचे अनुकरण करावे असे आदर्श अपवादाने दिसत असले, 'तरी यश मिळवीनच मिळवीन' या जिद्दीने भवतालच्या मोहांवर मात करत मी माझी जीवननौका प्रवाहात लोटून पार करीन, हा विश्वास आपण मनात बाळगायला हवा. 'मी स्वत:शीच स्पर्धा करीन,' त्याचे समाधान, आनंद माझ्या मनी असेल. आपल्यासाठी कुणी काही केलं असेल तर त्याविषयी कृतज्ञता मी मनात बाळगीन, सदैव मातृऋण मानीन. असे वागणे जमले तर परिस्थिती, अन्याय यांचा प्रतिकार करताना मी त्याचा डंका पिटणार नाही. स्वत:सारखीच आणखी चार कृतार्थ व्यक्तिमत्त्वं घडवण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. 'मी या समाजाचं देणं लागतो' ही कृतज्ञतेची भावना मनात असेल, तर माझे भाग्य आपोआपाच उदयाला येईल. उज्ज्वल यशाचे स्वप्न साकार होईल.

# छात्र प्रबोधन

**सौर चैत्र, शके १९४२। वर्ष २० अंक ७**
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३३३ वा अंक, वर्ष २८ अंक ९)
प्रकाशन दिनांक – सौर २६ चैत्र, शके १९४२/१५ एप्रिल २०२०


ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

*वासंतिक विशेषांक*

## अंतरंग


४. **संवाद** – शिल्पा कुलकर्णी
५. कथा... **खरे स्वच्छतादूत!*** – मृणालिनी कानिटकर-जोशी
१०. कविता... **अशी बोलावी रे भाषा!*** – ऐश्वर्य पाटेकर
११. ललित... **फणसायन** – रेखा ठाकूर
१३. चित्रपट परिचय... **१९१७ - युद्धपट** – शिल्पा कुलकर्णी
१६. विज्ञान प्रयोग... **उडी मारणारा बेडूक** – संकलन
२१. प्रासंगिक... **क्या है ये करोना?*** – डॉ. प्रदीप आवटे
२४. कथा...**कहाणी एका जिद्दीची** – सुहासिनी देशपांडे
२९. मुलांचे पान... **असे घडवले दुर्ग जागर मोहिमेने*** – कु. आर्या लिमये
३२. **व्यक्तिकार्ये**
३३. **हस्तलिखित स्पर्धा - परीक्षण आणि निकाल***
मुखपृष्ठाच्या आतील पद्य...**स्वप्न उद्याच्या उजळ दिसांचे...***– राम डिंबळे
**अंकासोबत आकर्षक भेट पुस्तिका - पत्त्यांचे खेळ (पान क्र. १७ ते २०)**
**याशिवाय :** आदरांजली (१०), आमची ऑनलाइन शाळा (३१), हा हा हा (३२)


**पानाखालील कवितेच्या ओळी** : निसर्गपर **माहितीपर ओळी** : भारतातील नृत्यप्रकार

### मुखपृष्ठाविषयी

उत्तराखंड येथील जिम कॉर्बेट नॅशनल पार्क येथे गेले असताना आमच्या रेझॉर्टच्या बाहेर दिसलेला हा निसर्ग! झाडांची कमान व त्यातून डोकावणारी उन्हाची तिरीप हे दृश्य मोठं विलोभनीय होतं. तिथे असताना त्याचं स्केच काढून घेतलं. आणि घरी आल्यावर जलरंगाचा वापर करून, ते चित्र पूर्ण केलं.

**– आसावरी अरगडे**

**१०० कथा वाचू या! 'कुमारकथा' ॲप द्वारे**

**अवश्य वाचा... पाहा... ऐका...**
*** या लेखांना QR कोड दिले आहेत ते स्मार्टफोनवर स्कॅन करा.**
त्यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून QR code scanner मोफत डाऊनलोड करून घ्या.


ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
**भेट द्या! मासिकाच्या संकेतस्थळाला!!** संकेतस्थळ : www.chhatraprabodhan.org

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक : शैलजा देशमुख**

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे
नीलिमा करमरकर, आश्लेषा महाजन

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
अनादी ढवळे

**मुखपृष्ठ –** आसावरी अरगडे
**आतील चित्रे –** चित्रांजली

**संपर्क पत्ता**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०) २४२०७१७४/१७५

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २०० **द्वैवार्षिक :** ₹ ४००
**त्रैवार्षिक :** ₹ ५५० **दशवार्षिक :** ₹ १७००

**या अंकाची किंमत : ₹ २०/–**
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा
चेक/डी.डी. **'ज्ञान प्रबोधिनी'** अथवा **'Jnana Prabodhini'** याच नावाने काढावा.

**NEFT साठी बँकेचे तपशील पुढीलप्रमाणे –**
**Account Name -** Jnana Prabodhini
**Bank Name -** Bank Of India
**Account No.-** 051510110004917
**Branch -** Shanipar, Pune
**IFSC Code -** BKID0000515
ऑनलाईन वर्गणी भरल्यावर 'छात्र प्रबोधन'ला मेल करून त्याचे तपशील कळवा.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.


छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

वार्षिक प्रायोजक – • श्री. प्रमोद चिंतामण पेठे, पुणे • एक हितचिंतक, पुणे • सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे • श्री. उदय परांजपे, पुणे

**प्रिय प्रबोधकांनो,**

गेले महिनाभर आपल्या सर्वांच्या जगण्याची गती खूपच मंदावली आहे, थंडावली आहे. आपल्या वेगवान जीवनशैलीला करोना विषाणूने जणू काही करकचून 'ब्रेक' लावला आहे!

जगभरात या विषाणूच्या संसर्गामुळे झालेला हाहा:कार, तेथील मृत्यूंचे प्रमाण, विस्कटलेले जनजीवन हे पाहून प्रश्नांचे, शंकांचे मोहोळ आपल्या भवताली उठत आहे. पण आपल्या प्रशासनाने योग्यवेळी उचललेल्या *'लॉकडाऊन'सारख्या* कठोर पावलांमुळे, तुलनेने अधिक लोकसंख्या असलेल्या आपल्या विकसनशील देशात करोना विषाणूच्या संसर्गाला आपण काही प्रमाणात तरी अटकाव घालू शकतोय. त्यासाठी अहोरात्र झटत असलेले डॉक्टर, परिचारिका, करोनावर लस शोधणारे शास्त्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी, पोलीस, जीवनावश्यक वस्तुंच्या सेवा पुरवणारे घटक, स्वच्छता कर्मचारी या सर्वांप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करू या. प्रशासनाचे नियम पाळून जबाबदार नागरिक होण्याचे कर्तव्य बजावून, करोनाविरुद्ध लढणाऱ्या आपल्या सर्व यंत्रणांना अधिक मजबूत करू या!

**'मी घरात अडकून पडलो/पडले आहे? की, याक्षणी मी घरात सर्वांत सुरक्षित आहे?' दोस्तांनो, प्रश्न असतो तो फक्त दृष्टिकोन बदलण्याचा!** मान्य आहे की, करोनाच्या या जागतिक संकटामुळे आपण अनिश्चिततेच्या, भीतीच्या छायेत वावरत आहोत. सर्वांचं दैनंदिन आयुष्याचं चक्र कोलमडलंय. तुम्ही जरी आपापल्या घरी सुरक्षित असलात, तरी ज्यांना घर नाही, जे स्थलांतरित आहेत, झोपडपट्टीत राहाणारे आहेत; शिवाय ज्या लोकांचे हातावर पोट आहे त्या सर्वांपुढे 'आ वासून' उभ्या राहिलेल्या प्रश्नांची तुम्ही किमान जाणीव ठेवायला हवी! त्यामुळे तुमच्या मनातील नकारात्मक विचारांची हकालपट्टी व्हायला मदत होईल. दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न करा, म्हणजेच या **संकटात संधी शोधण्याचा प्रयत्न करा.** म्हणजे बघा हं... सध्या तुम्हाला शाळेत जाता येत नाहीये, तर अनेक ठिकाणी *झूम ॲपद्वारा* शाळाच तुमच्या घरात भरतेय! तसंच अजून अशी कोणती *ॲप* तुम्हाला शोधता येतील, जे रंजनाबरोबरच तुमच्या बुद्धीला चालना देतील?

एरवीच्या भरगच्च वेळपत्रकामुळे अवांतर वाचनाला तुम्हाला फारसा वेळ मिळत नाही. मग या अचानक मिळालेल्या वेळेचा फायदा वाचन करण्यासाठी करून घ्या. छात्र प्रबोधनचं **कुमारकथा *ॲप*** पण आहेच तुमच्या हाताशी! **'छात्र प्रबोधन'तर्फे *वॉटस् ॲपवर* 'ऐपावा'** (ऐका-पाहा-वाचा) असा गट केला आहे. त्यावर रोज एक ऑडिओ, व्हिडिओ क्लिप व लेख देत आहोत. त्या गटात सहभागी व्हा आणि तुमची सुट्टी समृद्ध करा. **'छात्र प्रबोधन'च्या प्रकट वाचन स्पर्धेत** सहभागी व्हा... (दोन्हीसाठी **7774969623** या भ्रमणध्वनीवर *वॉटस् ॲप* करून अधिक माहिती मिळवा.) त्याचबरोबर तुमच्यातल्या **कल्पकतेला डोकं वर काढण्याची संधी द्या!** एखादी कलाकृती, नवीन खेळ, कोडी तयार करा आणि भावंडांना, आई-बाबांना करून घ्या त्यात सामील!

आणि हो, या अंकात **धम्माल पत्त्यांच्या खेळांची पुस्तिका** दिली आहे. ते खेळ खेळून बघाच; पण नवीन नियम तयार करून वेगळाच खेळ तयार करता येतो का, हेही पाहा. अंकात दिलेली **व्यक्तिकार्य** करा आणि आपल्या कुटुंबाशी संवाद वाढवण्याचा, नव्याने ओळख करून घेण्याचा प्रयत्न करा. ही नमुन्यादाखल यादी दिली आहे. तुम्ही या दिशेने विचार केलात तर अनेक कल्पक गोष्टी तुम्हालाही सुचतील. त्या नक्की करून पाहा.

छापखाने बंद असल्यामुळे उपलब्ध साधनं आणि मनुष्यबळ यांचा उपयोग करून 'छात्र प्रबोधन'चा चैत्र महिन्याचा वासंतिक विशेषांक (*वर्क फ्रॉम होम* कसं करायचं हे शिकता-शिकता) 'ई-अंक' म्हणून काढण्याची संधी आम्हीदेखील घेतली आहे. हा **ई-अंक** कसा वाटला, हे कळवायला मात्र विसरू नका! (सर्व सुरळीत झाल्यावर सभासदांना छापील अंकदेखील पाठवणार आहोतच!)

तुमचा वेळ तुम्ही कल्पकतेनं वापरावा व त्याचबरोबर तुमच्या आसपासच्या, अडीअडचणीत सापडलेल्या माणसांना शक्य होईल ती मदत करावी, ही अपेक्षा! तुमचे अनुभव आम्हाला नक्की कळवा!

तुमची,
**शिल्पाताई**



**माहिती मिळवा : भरतनाट्यम् - तामिळनाडू :** भरतमुनींच्या नाट्यशास्त्रावर आधारित एकल नृत्यशैली.

**वार्षिक प्रायोजक -** • श्रीमती लीला आचवल, नाशिक • सौ. उषा पुरंदरे, पुणे • सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे • एक हितचिंतक, पुणे

# खरे स्वच्छतादूत!

मृणालिनी कानिटकर-जोशी



मानस आणि प्रीत शाळेजवळच्या *बस-स्टॉपवर* उतरले. नेहमीप्रमाणेच बसमधल्या ३-४ लोकांनी खिशातलं तिकीट रस्त्यावर फेकलं. प्रीत आणि विकीने सुद्धा रोजच्याप्रमाणेच आपली तिकिटं रस्त्यावर फेकली. वरदानेसुद्धा खिशातली चॉकलेटची चांदी हळूच रस्त्यावर सोडून दिली. तेवढ्यात तिथून जाणाऱ्या दिव्यानं त्यांना पाहिलं. दिव्यानं त्यांना रागाने हटकलं. ''काय हे प्रीत, वरदा! कचरा असा रस्त्यात टाकतात का?''

''ए दिव्या, तू स्वच्छतामंत्री असलीस तर शाळेतली. इथं तू मला काही बोलायचं नाहीस.'' प्रीतने तिला लगेच प्रत्युत्तर दिलं.

''आणि रस्त्यावर लोक काय काय घाण टाकतात. आम्ही तर फक्त तिकीट फेकलं आहे,'' मागून आलेल्या विकीनं त्याला पुस्ती जोडली. लगेच प्रीत बोलला,

''आणि रस्ते झाडून घ्यायला कामगार पण असतातच ना!''

''अरे, पण ते चुकीचं वागले म्हणून आपण पण तसंच करायचं का? उलट असा कचरा फेकणाऱ्या लोकांना आपण अडवलं पाहिजे.'' दिव्या आपला मुद्दा न सोडता बोलत राहिली. मानसने आपलं तिकीट दप्तरात नीट ठेवलं होतं आणि शाळेत गेल्यावर तो ते तिकीट *डस्टबीनमध्ये* टाकणार होता. मानसचे आई-बाबा त्याला मुळीच असा कचरा करू द्यायचे नाहीत. मानसला आई-बाबांचं म्हणणं नेहमीच पटायचं. आणि प्रीतच्या वागण्याचं खूप आश्चर्य वाटायचं. खरंतर प्रीत मानसला खूप आवडायचा. तो मानसच्याच सोसायटीमध्ये

ऐकूया
या कथेची झलक
आणि ही कथा कशी सुचली
याबाबत लेखिकेचे मनोगत!

राहायचा. मानसपेक्षा दोन वर्षांनी मोठा होता. त्याच्याच शाळेत तो इ. नववीच्या वर्गात होता. प्रीत नेहमी सगळ्या मुलांना भारी भारी गमतीजमती सांगायचा. त्यामुळे सगळ्यांचा अगदी *हिरोच* होता तो! मग असा हुशार प्रीत चुकीचं कसं



वार्षिक प्रायोजक – • सौ. गीतांजली जोशी, सिकंदराबाद • एक हितचिंतक, दिल्ली
• डॉ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर • सौ. सीमा परांजपे, पुणे

वागेल, असं नेहमी वाटायचं त्याला; पण आता दिव्या जे सांगते आहे, ते पण बरोबर आहे; असं त्याला मनापासून वाटत होतं. पण प्रीत तरी कशाला चुकीचं वागेल? तो म्हणतो आहे ना रस्ता झाडायला कामगार असतात, ते नेतील की कचरा उचलून! नाहीतरी आपण *डस्टबीनमध्ये* टाकलेला कचरा शेवटी कचऱ्याच्या गाडीतूनच पुढे जाणार आणि रस्त्यावरचा कचरादेखील त्याच गाडीतून जाणार! मानस स्वत:च्या मनाशी विचार करत होता. त्यालादेखील खूप वेळा असे कागदाचे कपटे, पेन्सिलला टोक केल्यावर पडणारे छिलके आहे त्या जागी टाकून द्यावेसे वाटायचे. शिपाईकाका रोज सकाळ-संध्याकाळ वर्ग झाडतातच, मग काय बिघडलं कचरा तिथेच टाकला तर, असं त्याला वाटायचं; पण शाळेने आणि आई-बाबांनी घालून दिलेली शिस्त तो सहसा मोडायचा नाही!

शाळेत पहिले दोन तास झाले आणि सर्व मुलांना शाळेच्या सभागृहात बोलावलं. थोड्याच वेळात शाळेच्या मुख्याध्यापिका रेवतीताई आणि इतर शिक्षक सभागृहात आले. 'आज का बरं आपल्याला इथे बोलावलं असेल?' सगळ्यांची उत्सुकता ताणली गेली होती. रेवतीताई बोलायला उभ्या राहिल्या.

"बरं का मुलांनो, आपण पुढचे पंधरा दिवस 'स्वच्छता पंधरवडा' म्हणून साजरा करणार आहोत. सर्वांनी आपापले वर्ग, व्हरांडे, *ग्राउंड* झाडून स्वच्छ ठेवायचं. आपापले बाक, फळे, *टेबल्स* पुसायची. या कामात सर्व शिक्षकपण सहभागी होणार आहेत. आपले सर्व मामा, मावश्या तुम्हाला या कामांना मदत आणि मार्गदर्शन करणार आहेत. आहात ना तय्यार?"

छोट्या वर्गांच्या ओळींमधून "होऽऽऽ" चा पुकारा झाला. आणि मोठ्या मुलांच्या बाजूनी "अरे काय!" "o hh! shit!" अशा प्रतिक्रिया येत होत्या. मानसला या सगळ्यांची खूपच मज्जा वाटत होती. वरदाने तर उभं राहून ताईना विचारलं की, 'आम्ही बागेला पाणीपण द्यायचं आहे का?' अर्थात ताईंनी लगेच तशी परवानगी दिली. मुलांची आपापसात चर्चा सुरू झाली. कोणी आनंदी, कोणी नाराज तर काही मंडळी नुसती गोंधळून गेलेली होती.

थोडा गलका शांत झाल्यावर ताईंनी अजून एक महत्त्वाची घोषणा केली. ती ऐकल्यावर मात्र "ईऽऽ", "आं?" "नाही", "नको"च्या आवाजांनी सभागृह दणाणून गेलं. ताईंनी सांगितलं होतं की, मुलांना मोठ्यांबरोबर स्वच्छतागृहांची स्वच्छता पण करायला लागणार आहे.

मानसला इतर मुलांप्रमाणेच *टॉयलेट* स्वच्छ करण्याची *आयडिया* काही फारशी आवडली नव्हती; पण एकूण खूप खूष होता तो! कधी घरी जाऊन आई-बाबांना ही गंमत सांगतोय, असं त्याला झालं होतं. बसमध्ये पण त्यांची तीच चर्चा चालू होती. अर्थात दिव्या आणि वरदा मानसच्या बाजूनं तर प्रीत आणि विकी त्यांच्या विरुद्ध होते.

दुसऱ्या दिवशी शाळेत मुलांची नुसती लगबग चालली होती. पहिल्या दोन तासांत सगळी साफसफाई करून मग नेहमीचा अभ्यासही करायचा होता. कामाची सवय नसल्याने मंडळी अगदी दमून गेली होती. शिपाईमामांबरोबर जी मुलं *टॉयलेट* स्वच्छ करायला गेली होती; त्यांना शिपाईमामांच्या, साफसफाई करणाऱ्या


**माहिती मिळवा : कथ्थक- उत्तरप्रदेश :** भावनाप्रधान आणि चमत्कारप्रधान तत्त्वावर आधारित शास्त्रीय नृत्यशैली.

**वार्षिक प्रायोजक –** • श्री. प्रमोद वासुदेव जोशी, पुणे
• असेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., ९८६०४०४९९०, पुणे

मावशींच्या अवघड आणि अतिशय महत्त्वाच्या कामाची पुरती कल्पना आली होती. मुळात त्यांना हे सगळं समजावं, स्वच्छता करणाऱ्या लोकांच्या कामाचं महत्त्व लक्षात यावं; म्हणूनच तर शाळेने ही योजना आखली होती.

आज शाळेला रविवारची सुट्टी होती. प्रीत, मानस, दिव्या, वरदा, अभिज्ञा आणि इतर काही दोस्त मंडळी सोसायटीच्या मैदानावर जमली होती. स्वच्छता कामगारांचे काम किती अवघड आहे यावर ते चर्चा करत होते. प्रीतचं म्हणणं होतं की, 'आपण कितीही नीट वागलो, कचरा *डस्टबीनमध्येच* टाकला तरी शेवटी तो कोणाला तरी उचलावा लागतोच ना?' कोणाच्याच वाट्याला हे असं काम यायला नको. सगळ्याच मुलांना प्रीतचं म्हणण मनातून पटत होतं. मग यासाठी काय करावं बरं? त्यांची आपापसात भरपूर चर्चा झाली. घरी परत जाताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता.

दुसऱ्या दिवशी ही सगळी *गँग* शाळेच्या 'ए.टी.एल.' मध्ये म्हणजे *'अटल टिंकरिंग लॅब'मध्ये* दाखल झाली. तिथे कौस्तुभदादा त्यांना वेगवेगळे प्रयोग करून दाखवायचा. *रिमोट कंट्रोल कार, रोबो* अशा काय-काय गोष्टी दादा करून दाखवायचा आणि मुलांना देखील करायला शिकवायचा. सगळ्यांनी कौस्तुभदादाला गराडा घातला आणि त्यांची सगळी चर्चा त्याच्या कानावर घातली.

''दादा, म्हणूनच आम्हाला तुझी मदत हवी आहे. आपण असा एक *रोबो* तयार करूया, जो ही सगळी काम करेल.'' मानसने कौस्तुभसमोर प्रस्ताव मांडला.



''चला, आपण रेवतीताईशी बोलू. त्यांनी परवानगी दिली तर करूया प्रयत्न.'' कौस्तुभदादाच्या बोलण्यावर सगळे खूष झाले, आणि मंडळी रेवतीताईंच्या *ऑफिसमध्ये* आली. रेवतीताईनी या सर्व कल्पनेला हसून संमती दिली. ''पण ताई, असा *रोबो* लगेच बनवता नाही येणार. त्याला वेळ लागेल. मुलांना या प्रयोगाचं फलित लवकर मिळायला हवं असेल तर मी अजून एक *आयडिया* सांगतो.''

''कोणती *आयडिया* ?'' रेवतीताईनी विचारलं.

''ताई, माझ्या बाबांची *रोबोटिक्स* ही कंपनी आहे, हे तुम्हाला माहीत आहेच. नुकतेच आम्ही 'निर्मल' आणि 'विमल' असे दोन स्वच्छतादूत अर्थात - *रोबो* आमच्या कंपनीत बनवले आहेत. मानवी भावभावनांचा काहीसा आविष्कार ते करू शकतील अशी *टेक्नॉलॉजी* पण त्यात वापरली आहे. कंपनीत छोट्या प्रमाणावर त्यांचा



वार्षिक प्रायोजक – • श्री. शशांक चांदोरकर, पुणे
• श्री. सतीश शंकर कुलकर्णी, सातारा

वापर करून बघितला आहे. इथे त्यांचा वापर केला तर आमच्या कंपनीचा हा प्रयोग किती यशस्वी झाला आहे, ते आम्हाला पण समजेल. अर्थात या सगळ्याला बाबांनी परवानगी दिली तर!'' कौस्तुभदादाचं बोलणं ऐकून मुलांनी टाळ्याच पिटल्या.


''आम्ही बोलू का तुझ्या बाबांशी?'' दिव्यानं विचारलं. कौस्तुभनं दिव्याच्या डोक्यावर हलकेच थोपटले आणि तो छानसा हसला.

हे सर्वजण ऑफिसमधून बाहेर पडल्यावर अश्विनीताईंनी शंका उपस्थित केली.

''रेवतीताई आपण मुलांना स्वच्छतेचं महत्त्व पटावं म्हणून आणि कोणतंही काम कमी दर्जाचं नसतं, त्याबरोबरच सर्वांना हे काम करायची सवय असावी, लाज वाटता कामा नये, हे त्यांना कळावं अशा उद्देशानं हा सर्व उपक्रम राबवायचा ठरवलं ना! मग त्यांनी यंत्राच्या साहाय्यानं हे काम केलं तर आपलं उद्दिष्ट कसं सफल होणार?''

''अश्विनी, या प्रयोगातून मुलांची संवेदनशीलता जागृत झाली, हे किती महत्त्वाचं आहे! आणि यंत्राचा वापर करणं काही गैर नाही. शिवाय आपल्या या उपक्रमाच्या शेवटी आपण आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचत नाही आहोत, असं आपल्या लक्षात आलं तर आपण ठरवूया काय करायचं ते! शेवटी आपणही प्रयोगच करत आहोत. त्याचे काय *रिझल्ट* येतील हे आधी सांगू शकत नाही ना.'' रेवतीताईंनी अश्विनीताईंच्या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर दिलं.

दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर परत सर्वांना सभागृहात बोलावलं. 'आता काय?' असा प्रश्न मानस, प्रीत आणि त्यांच्या कंपूमधली इतर मंडळी सोडून सगळ्यांना पडला. कौस्तुभदादा 'निर्मल' आणि 'विमल' या दोन स्वच्छतादूतांना घेऊन शाळेत दाखल झाला होता. रेवतीताईंनी कालचा प्रसंग सर्वांना कथन केला. मुलांच्या संवेदनशीलतेचं आणि कल्पकतेचं कौतुक केलं. कौस्तुभचे आभार मानले. अतिशय उत्सुकतेने आणि आनंदानं सर्व मुलं एवढंच काय सर्व शिक्षक आणि शिपाईमामा – मावश्यादेखील 'निर्मल' आणि 'विमल' भोवती गोळा झाले.



'निर्मल' आणि 'विमल' आल्यावर शाळा आणि परिसर एकदम चकाचक झाला. रोज अवघ्या २ तासांत त्यांनी संपूर्ण



**माहिती मिळवा : कथकली – केरळ :** कथा म्हणजे गोष्ट, कली म्हणजे खेळ या दोन्हींचा संगम असलेले नृत्य.

वार्षिक प्रायोजक – • श्री. साहिल कोठारी, बारामती • श्री. अमित बागाईतकर, पुणे • श्री. मयुरेश सोहोनी, पुणे

शाळा आणि मुख्य म्हणजे *टॉयलेट्स* अगदी साफ केलेली असायची. आठ दिवसांमध्ये बागेचं रूपडंपण अगदी बदलून गेलं. रेवतीताई, अश्विनीताई, कौस्तुभदादा आणि इतर शिक्षकही या सर्व घडामोडींवर लक्ष ठेवून होते.

कचरा न करण्याचा, असलेला कचरा योग्य जागी टाकण्याचा मुलांचा सुरुवातीचा उत्साह हळूहळू कमी होत होता. आठ दिवसांनी तर जवळ जवळ 'जैसे थे' अशी परिस्थिती झाली. आपण केलेल्या उपक्रमाचं - प्रयोगाचं पुढे नक्की काय होणार याची काळजी आणि तेवढीच उत्सुकता रेवतीताईंबरोबरच सर्व शिक्षक आणि शिपाईमामा आणि मावश्यांना होती.

सोमवारी नेहमीप्रमाणे सर्व मुलं शाळेत आली. त्यांच्या किलबिलाटानं शाळेचं आवार गजबजून गेलं. पण थोड्याच वेळात सगळ्यांचे चेहरे काळजीने काळवंडून गेले. शाळेचा परिसर, वर्ग, *टॉयलेट्स* सगळीकडे अस्वच्छतेचं, कचऱ्याचं साम्राज्य पसरलेलं होतं. आणि मुख्य म्हणजे 'निर्मल' आणि 'विमल' कुठेच दिसत नव्हते. सगळ्यांची धावाधाव सुरू झाली. कौस्तुभदादानं *जी.पी.एस.वरून* दोघांचा शोध घेतला. शाळेच्या मागच्या *गेट* जवळ झाडीमध्ये बसलेल्या 'निर्मल' आणि 'विमल'ला घेऊन कौस्तुभ थेट *लॅबमध्ये* गेला. सर्वजण त्याची वाट बघत सभागृहात थांबून राहिले.

"'निर्मल' आणि 'विमल' संपावर गेले आहेत.'' कौस्तुभनं सभागृहात येऊन सर्वांना सांगितलं. सगळ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे भाव उमटले.

''काय झालं आहे हे बघायला मी दोघांचा डेटा *ॲनालिसिस* केला. खेदाची गोष्ट अशी की, कचरा आणि अस्वच्छता याचं प्रमाण अत्याधिक असल्यामुळे दोघांची ही काम करण्याची क्षमता कमी झाली आहे. त्याचप्रमाणे आम्ही त्यांच्यामध्ये काही प्रमाणात मानवी भावनांचा आविष्कार केला असल्याने त्याचे पण *रिझल्ट्स* आले आहेत. यात 'विमल' आणि 'निर्मल'ने राग, दुःख, निराशा, उद्विग्नता, नैराश्य या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या कशामुळे आल्या असतील हे मी तुम्हा मुलांना सांगायची गरज आहे, असं वाटत नाही मला.'' कौस्तुभ बोलत होता, मुलांच्या चेहऱ्यावरचे भाव पालटत होते.

सभागृहात एकदम शांतता पसरली होती. दिव्या पुढे आली.

''रेवतीताई, आमचं सर्वांचं चुकलंच.'' तिच्या डोळ्यात पाणी होतं. अजून दोन-तीन मुलं पुढे आली. ''ताई, दिव्या आम्हाला नेहमी सांगायची; पण आम्ही तिच्याकडे दुर्लक्ष करायचो.''

''मग, आता काय करायचं?'' रेवतीताईंनी विचारलं.

''ताई, 'निर्मल' आणि 'विमल'ला आपण परत पाठवू. आणि परत अशी वेळ कोणावरच येणार नाही याची काळजी घेऊ.'' मानसनं पुढे येऊन सांगितलं. सर्वांनी त्याच्या म्हणण्याला टाळ्यांनी प्रतिसाद दिला.

रेवतीताई अश्विनीताईकडे आणि कौस्तुभदादाकडे बघून हसल्या. त्यांचा उपक्रम १००% यशस्वी झाल्याची पावतीच त्यांना मुलांच्या प्रतिसादातून मिळाली होती!

●●●

**- मृणालिनी कानिटकर-जोशी**
एफ-३४, वृंदावन पार्क अपार्टमेंट्स,
महात्मा सोसायटीजवळ, कोथरूड,
पुणे 411038

पहाट झाली, रवि उगवला उधळत रंगसडे । चैतन्याची चाहूल उठली, प्रफुल्ल पूर्वेकडे ।।



वार्षिक प्रायोजक - • श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे • श्री. विक्रम कामठे, पुणे
• श्री. धनंजय गोखले, पुणे

कविता

# अशी बोलावी रे भाषा !



अशी बोलावी रे भाषा
तिनं माणूस जोडावा।
आत्मा जाणावा असा की
शब्द दंभाचा खोडावा...।।

वात्सल्याच्या हंबराला
नात्यागोत्याची तहान।
जसा जिव्हाळा जपावा
वाटो डोंगर लहान।।

चराचरामधी तिनं
लाख चैतन्य पेरावं।
श्रम-साफल्याचं बीज
वर तरारून यावं।।

माणसांच्या मनावर
नको तवंग गढूळ।
अंतरीच्या विहिरीचा
तळ असावा निर्मळ।।

असा एक एक शब्द
क्लेश, द्वेष जळो जावे।
समतेच्या आरशात
बंधुत्वाला न्याहाळावे।।

आर्त विश्वाचे तिच्यात
असो ज्ञानेशाची ओवी।
नामयाची तुकयाची
असो चोखोबाची वाणी।।


अशी बोलावी रे भाषा
नको गरीब श्रीमंत।
समृद्धीच्या हिश्यामधी
ज्याची त्याची गा दौलत।।

दुधावर साय जशी
तशी माया उफाळून।
ममत्वाचा धागा धागा
द्यावा भाषेनं जोडून।।

बोला कोणतीही भाषा
तिची असो हीच तऱ्हा।
फक्त जिभेवर असो
खडी-साखरेचा खडा...।।

वाचूया
याच आशयाची कविता
आणि तिचे रसग्रहण
कवयित्री - सुनीला गोंधळेकर


- ऐश्वर्य पाटेकर
काकासाहेबनगर, ता. निफाड
जि. नाशिक 422308

## ✲ भावपूर्ण आदरांजली! ✲

ज्येष्ठ कवी **किशोर पाठक** यांचे २१ मार्च, २०२० रोजी दीर्घ आजाराने वयाच्या ६८ व्या वर्षी दु:खद निधन झाले. 'छात्र प्रबोधन'च्या कुमार वाचकांसाठी त्यांनी अनेक कविता लिहिल्या. गेयता, नादमयता असलेली त्यांची संस्कारक्षम कविता कुमारांचे भावविश्व समृद्ध करणारी आहे. त्यांचे बालकुमारांसाठीचे अनेक कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. याशिवाय कादंबरी, ललित लेख, कथा, काव्य, नाटक अशा विविध साहित्य प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले गेले.

नाशिकमध्ये वास्तव्य असल्यामुळे नाशिकच्या सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रांत त्यांचे मोठे योगदान होते.

**'छात्र प्रबोधन' परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली!**

माहिती मिळवा : मणिपुरी - मणिपूर : कृष्णभक्ती हा या नृत्यप्रकाराचा मुख्य गाभा.


वार्षिक प्रायोजक - • श्री. साहिल कोठारी, बारामती
• श्री. अमित बागाईतकर, पुणे

ललित

# फणसायन

- रेखा ठाकूर



मी निसर्गाची भाट आहे. निसर्गाची स्तोत्रे मनोभावे आळवणे हा माझ्यासाठी आनंदाचा ठेवा आहे; पण सरत्या वर्षातलं त्याचं भेसूर, विध्वंसक आणि प्रलयंकारी थैमान माझी अवस्था **'कंठातच रुतल्या ताना...'** अशी करून गेलं. उघड्या पुस्तकातली पानं न वाचताच फडफडून गेली. त्यात 'फणसायन'सुद्धा ओलेकिच्च झालं. आता जरा कुठे भिजकी वही कोरडी झाली म्हणून ठेवता येतेय तुमच्यापुढे...!

नवथर उत्साहाच्या भरात चार आपली आपली वाढणारी, फारशी उगनिगा करावी न लागणारी झाडं लावणं, हा हौसेचा मामला असतो.

'कुंकवाला किंवा चहाला नाही म्हणायचं नसतं,' म्हणतात; त्याच चालीवर कुणी प्रेमाने दिलेल्या रोपालाही नाही म्हणू शकतो का आपण?

आमच्या कोकणातल्या एका घट्ट मित्राने फणसाची चक्क दोन कलमं मुद्दाम धाडून दिली आणि वर 'हा बिनचिकाचा आणि बोन्साय फणस आहे बरं!' अशी साखरपेरणीही केली. आले ना वांधे! दगड माहिती नाही, फणसाच्या रोपाची निगा कशी राखायची याची!

लहानपणी फणसाच्या पानांचे बैल करायचो तेवढंच! सतत पानझड! हिरवट, पिवळसर पानांनी अंगण भरून जायचं. त्या आठवणी जागवत ती दोन्ही कलमं जुळ्या भावंडांसारखी बागेत वसतीला आली.

भराभर वाढू लागली. फांद्या हिरवळायला लागल्या. आणि बुलबुल, दयाळ, सातभाई, चिमण्या, कावळे आणि लबाड कोकिळा ह्यांची पानांच्या दाटीत गजबज सुरू झाली. तीन-चार वर्षात दोन्ही झाडं चांगली उंचनिंच झाली. आणि अचानक एक दिवस हिरव्या-पिवळ्या पानांच्या आडून एक हिरव्या मखमलीची बोटाएवढी कुयरी डोकावू लागली. झालं! माझ्या डोळ्यांसमोर सोनेरी गऱ्यांनी भरलेले डेरेदार फणस नाचू लागले. पण ती कुयरी हळूहळू काळवंडत गेली आणि झाडाखाली गळून पडली. नंतरच्या वर्षीही खूप कुयऱ्या धरल्या आणि यथावकाश काळ्या ठिक्कर पडल्या. मी पाठ फिरवली झाडाकडे निराश होऊन!

पण गतवर्षी खूप कुयऱ्या नेटाने झाडाला धरून राहिल्या होत्या. कवठीचाफ्यासारख्या दाट पाकळ्या एका कुयरीभोवती ओंजळ करीत उगवल्या आणि कुयरीचा गुटगुटीत कळा तयार झाला. निसर्ग सगळी रहस्ये खुली करत नाही, काही आडपडदे राखतोच! थेट एक कोवळ्या काट्यांचा फणसच सूर्यप्रकाशात झुंबरासारखा चमकला आणि मी हत्तीवरून साखर वाटायचीच बाकी ठेवली. ताकास तूर लागू न देता एवढा प्रवास केव्हा केला याने?

मखमली काटे हळूहळू टचटचीत होऊ लागले आणि त्याच देठाला आणखी एक



वार्षिक प्रायोजक – • डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, शेफिल्ड, यु.के.
• श्री. विद्यानंद देवधर, कोल्हापूर • श्री. अंबरीश देशमुख, पुणे

सवंगडी येऊन लटकू लागला आणि '**थ्री मस्केटीअर्ससारखा**' तिसराही त्याला गळ मारून सामील झाला. मला गुण्यागोविंदाने नांदणारे ते त्रिकूट पाहून अगदी तीन अस्वलांची गोष्ट दिसायला लागली तिथे. आई, बाबा आणि बाळ अस्वल... तिघेही दिसामासी चांगले गरगरीत दिसायला लागले. आता काटे चांगलेच पसरू लागले आणि तीक्ष्ण ही झाले. मात्र हे पिकणार केव्हा, ह्याची गंधवार्ता पाखरांनाही लागेना. नुसते भरताड दिवस जात राहिले... एकाच देठाला तगून राहिलेले तिघेही गडी, ढिम्म!!

जात नवी, त्यामुळे झाडामाडांतल्या माझ्या कृषी जाणकार दिरालाही चकवा दिला त्यांनी. न राहवून एक बाबा उतरवला; पण कोवळा निघाला. गरे पातीसारखे, मात्र आठळ्या घसघशीत! मस्त स्वादिष्ट भाजी चाखतमाखत झाली; पण दारातल्या फणसाची म्हणून अपूर्वाई!!

मग पुरेशी वाट पाहून दुसरा फोडला. हा मात्र बाळसेदार गऱ्यांनी ठेच भरलेला! पिवळसर रंगाचे भरपूर गरे आणि तशाच मोठ्या आठळ्या! या



अपूर्वाईच्या गऱ्यांचं 'सांदणं' माझ्या नव्वदीच्या सासूबाईंनी आनंदाने केलं आणि पसंतीची मोहोर उठवली. आमचा मोठ्ठा गोतावळा! परडीभर गरे प्रसादासारखे घरोघरी दोन-दोन वाटले. चवीला अतिमधुर असलेल्या काप्या गऱ्यांनी जीभ चाळवली.

तिसरा उरलेल्यांच्या मुखी पडला आणि हंगाम सुफळ संपूर्ण जाहला!

'पुढच्या मोसमात झाड फणसांनी लगडून जावं आणि घरोघरी अख्ख्या फणसाचं वाण देता यावं,' असं सांगणं मी आवर्जून केलं आणि ते फळाला आलंही; कारण आताशाच मुळाशी पातेरा गोळा करताना, अगदी पार तळाशी कुयरीसकट एक फांदी डोकावताना दिसली आणि मग तशा अनेक फांद्या अगदी नखशिखांत दिसत राहिल्या, कविता पानोपानी सारख्या...!!

●●●


- **रेखा ठाकूर**

मैफल, घर नं. ७९७, गणपतीबाडा
देवळाय, खांडोळा, माशेल,
गोवा 403107


## सोडवा हे गंमत कोडे...

**मराठी भाषेत एकाच शब्दाचे दोन भिन्न अर्थ थक्क करून सोडतात. चला तर मग खालील शब्दांसाठी योग्य शब्द सांगा.**

१. संताप, संगीत प्रकार
२. पायताण, विद्युल्लता
३. ज्येष्ठ बंधू, गावगुंड
४. कागदाचा व कापडाचा शत्रू, कमतरता
५. मांडी, गणित
६. फसवणूक, मंतरलेला दोरा
७. पुलंचा हातखंडा, एक संख्या
८. देवांचे जेवण, ग्रहदशा
९. अनेक रहिवासी असलेली इमारत, पैंजण
१०. एक अवयव, प्रतिष्ठा
११. परिमल, मुक्काम
१२. दानवांचे पेय, मानेवरून फिरवल्यास मरण नकी
१३. चतकोर, बड्याचा साथीदार
१४. प्रकाश देणारी, मुलीच्या मुलीची मुलगी
१५. सन, फळाचे आवरण
१६. वित्त, आशय
१७. जन्मदाते, पालेभाजी
१८. पराजय, गळ्यातील माळ
१९. बोलता न येणारा, बाळाची पापी
२०. वैद्याचा स्टेथस्कोप, सलवारीची सोबतीण

(उत्तरे अन्यत्र)

**चला तर मग सोडवा पटापट..**



**माहिती मिळवा : कुचीपुडी - आंध्रप्रदेश :** गाणे आणि नृत्य दोन्हीचा संगम असलेला शास्त्रीय नृत्यप्रकार.


**वार्षिक प्रायोजक -** • श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५/९८२२०८९४६३
• सौ. किरण मुसळे - कुलकर्णी, सातारा




# भावनिक आंदोलनांचा प्रवास घडवणारा युद्धपट - '१९१७'

- शिल्पा कुलकर्णी

ही कथा आहे दोन ब्रिटिश सैनिकांची – लान्स नायक विल्यम स्कॉफिल्ड आणि लान्स नायक टॉम ब्लेक यांची! जनरल एरिनमोर यांनी सोपवलेली कामगिरी पार पाडण्यासाठी खुद्द काळाशी टक्कर देत, हे दोन सैनिक प्रयत्नांची शिकस्त करतात. जणू काही काळाविरुद्धच्या शर्यतीत ते दोघं पूर्ण ताकदीनिशी, सर्वस्व पणाला लावून उतरतात!!

'1917' या चित्रपटाच्या नावावरून लक्षात येतं, की हा चित्रपट इ.स. १९१७ मधला आहे. म्हणजेच पहिल्या महायुद्धाच्या कालखंडातला युद्धपट आहे.

६ एप्रिल १९१७ रोजी ब्रिटिश हवाई दलाने केलेल्या सर्वेक्षणातून जनरल एरिनमोरच्या लक्षात येतं की, जर्मनीने त्यांचं सैन्य उत्तर फ्रान्समधल्या *वेस्टर्न फ्रंटच्या* एका क्षेत्रातून हलवून; हिंदेनबर्गच्या उत्तर सीमेवर मोक्याच्या ठिकाणी नेलं आहे. आणि तिथून ब्रिटिश सैन्यावर हल्ला करण्यासाठी जर्मन सैन्य सज्ज झालं आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी बिटिश सैन्याकडून केल्या जाणाऱ्या हल्ल्याचा सुगावा जर्मन सैन्याला आधीच लागल्यामुळे जर्मन सैन्याने ताबडतोब *वेस्टर्न फ्रंटहून* माघार घेतली. ही धोरणात्मक खेळी जर्मनीने खेळली आणि ब्रिटिश सैन्यासाठी त्यांनी सापळा (trap) रचला.

केलेल्या हवाई सर्वेक्षणातून ही बाब पुढे आल्यामुळे, 'दुसऱ्या दिवशी सकाळी डिव्हेनशायर बटालियनकडून जर्मन सैन्यावर होणारा हल्ला रद्द करा' असा निरोप जनरल एरिनमोर यांना त्या बटालियनचे प्रमुख कर्नल मॅकेन्झींना द्यायचा असतो. त्यामुळे सुमारे १६०० ब्रिटिश सैनिकांचे प्राण वाचणार असतात.

ब्रिटिश खंदकातल्या सगळ्या *टेलिफोन लाईन्स* कापल्या गेल्यामुळे हा आदेश मॅकेन्झीपर्यंत तातडीनं कसा पोहोचवायचा, हा एरिनमोर यांच्यापुढे पेच आहे. त्यावर तोडगा म्हणून ते ही महत्त्वपूर्ण कामगिरी दोन तरुण ब्रिटिश सैनिक स्कॉफिल्ड आणि ब्लेक यांच्यावर सोपवतात. स्कॉफिल्ड काहीशा नाखुषीनेच होकार देतो. टॉम ब्लेकचा मोठा भाऊ जोसफ हा डिव्हेनशायर बटालियनच्या एका तुकडीत असल्यामुळे हा निरोप पोहोचवायला ब्लेक मात्र आतुर झालेला असतो.

डिव्हेनशायर बटालियनपर्यंत पोहोचणं आणि तेसुद्धा सकाळ होण्याच्या आत, हे मोठंच आव्हान या दोन सैनिकांपुढे असतं. एक तर हा आदेश खूप उशीरा म्हणजे जवळपास संध्याकाळी त्यांच्या हाती पडतो. आणि हा निरोप पोहोचवण्यासाठी *'नो मॅन्स लॅन्ड'* ओलांडून, भूमिगत असलेल्या मोकळ्या जर्मन बराकीतून, तर काही ठिकाणी जर्मनीच्या ताब्यात असलेल्या प्रदेशातून या दोन सैनिकांना



वार्षिक प्रायोजक – • सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका
• श्री. संजय प्रधान, सातारा • डॉ. नीरज रायते, पुणे

मार्ग आखावा लागणार असतो! सकाळ होण्याच्या आत त्यांना १४-१५ मैलांचं अंतर पायी तुडवत पार करायचं असतं.

या प्रवासात त्यांना अनेक संकटांना सामोरं जावं लागतं. सुरुवातीला अनेक ठिकाणी युद्धात मरून पडलेल्या सैनिकांच्या प्रेतांमधून त्या दोघांना वाट काढावी लागते. त्यातच प्रेतांचे लचके तोडायला आलेल्या गिधाडे, घुशी, उंदीर यांचा सुळसुळाट असतो. सर्वत्र झालेला रक्तपात, दलदलीचा प्रदेश, चिखल आणि घाणीचे साम्राज्य असते! पुढे जर्मनांच्या भूमिगत असलेल्या मोकळ्या बराकीत सुरुंग पेरून ठेवलेले असतात. हे दोन सैनिक तिथं पोहोचल्यावर त्या सुरुंगांची *वायर* कुरतडण्याचं काम उंदीर चोखपणे करतात. त्यामुळे सुरुंगांचा स्फोट होऊन ते ब्रिटिश सैनिक दगड-मातीच्या ढिगाऱ्यात गाडले जातात. स्कॉफिल्डला मरता मरता ब्लेक वाचवतो. स्कॉफिल्ड जायबंदी होतो. डोळ्यात माती-धुरळा गेल्यामुळे त्याला पुढचं काहीच दिसू शकत नाही. ब्लेक त्याला आधार देतो. काही ठिकाणी खांद्यावर वाहून आणतो. 'फक्त माझ्यावर विश्वास ठेव आणि माझ्या खांद्याला धरून माझ्या मागोमाग चालत राहा,' असं म्हणत ब्लेक त्याला आश्वस्त करतो.

मोठ्या कष्टाने स्कॉफिल्डला आधार देत ब्लेक एका मोकळ्या *फार्महाऊसवर* पोहोचतो. तिथे ते दोघे पाणी, दूध आणि अन्नपदार्थांचा साठा करून घेतात. तोपर्यंत वरती आकाशात दोन विमानांची चकमक होते. त्यातील अर्धवट जळलेले एक विमान त्यांच्या दिशेने हेलपाटत येते आणि जमिनीवर कोसळते. दोघे त्या जळत्या विमानातून जर्मन वैमानिकाला बाहेर काढतात. स्कॉफिल्ड त्याच्यासाठी पाणी आणायला जातो. बेसावध ब्लेकवर तो जर्मन वैमानिक जीवघेणा चाकूहल्ला करतो. गोळ्या मारून स्कॉफिल्ड त्या जर्मन वैमानिकाला यमसदनी धाडतो.

ब्लेकला उभारी देण्याची, त्याला वाचवण्याची स्कॉफिल्ड शर्थ करतो. पण हाय! अखेर ब्लेकचा मृत्यू ओढवतो. पण तत्पूर्वी ब्लेक स्कॉफिल्डकडून वचन घेतो की, 'ब्लेकने पळपुटेपणा केला नसून तो शूर, लढवय्यासारखा लढला' हे स्कॉफिल्ड न विसरता ब्लेकच्या आईला पत्र लिहून कळवेल. त्याचबरोबर एरिनमोरनी सोपवलेली कामगिरी फत्ते करून आपल्या मोठ्या भावाला भेटण्याचं वचनदेखील ब्लेक स्कॉफिल्डकडून घेतो.

हा प्रसंग अतिशय भावुक तरीही संयमितपणे चित्रीत केला आहे. त्या दोघांचे कामाच्या पलीकडचे दिसणारे मैत्रीचे बंध अतिशय तरलपणे, अनेक छोट्या-छोट्या प्रसंगातून चित्रपटाच्या ओघात येतात.

एखादं ध्येय जोडीने पूर्ण करताना एकमेकांना दिलेली साथ, प्रोत्साहन, एकमेकांना सांभाळून घेणं, मतांचा आदर करणं, एकमेकांना दिलेली वचनं आणि ती पूर्ण करण्यासाठी जीव पणाला लावून केलेली धडपड; हे सारं पडद्यावर बघताना अंगावर रोमांच उभे राहतात!

आता ही कामगिरी स्कॉफिल्डला एकट्याला पूर्ण करायची असते. वाट तुडवत असताना त्याला ब्रिटिश तुकडी नेणाऱ्या *लॉरीची सवारी* मिळते. थोडं पुढे आल्यावर कालव्यावरचा पूल तुटल्यामुळे *लॉरीला* त्यांचा मार्ग बदलावा लागतो. स्कॉफिल्ड मात्र त्या तोडक्यामोडक्या पुलाच्याआधारे कालवा पार करण्याचं आव्हान पेलतो. तिथं लपून बसलेल्या जर्मन सैनिकाला सुगावा लागतो. दोघांमध्ये घमासान होते आणि स्कॉफिल्ड जीव वाचवत कालवा ओलांडून एका पडक्या इमारतीपाशी येतो. तिथेही परत काही जर्मन सैनिकांबरोबर त्याची



**माहिती मिळवा : ओडिसी - ओरिसा :** मंदिर शिल्पांच्या मुद्रा हे ओडिसी नृत्याचे विशेष.

**वार्षिक प्रायोजक – • एक हितचिंतक, नाशिक –** कै. केदारेश्वर आचवल स्मरणार्थ
**• डॉ. विनायक देसूरकर, पुणे** **• डॉ. संजय गद्रे, धुळे**

चकमक उडते. त्या सैनिकांचा स्कॉफिल्ड खात्मा करतो; पण गोळी लागल्यामुळे तो बेशुद्ध पडतो. बऱ्याच वेळाने स्कॉफिल्डला शुद्ध येते. अंधारात चाचपडत असताना तळघरातल्या अंधाऱ्या खोलीत तो येतो. तिथे एक फ्रेंच महिला एका अर्भकासह आसऱ्याला आलेली असते. ती स्कॉफिल्डच्या जखमेवर प्रथमोपचार करते. त्या अर्भकासाठी तो गाणं म्हणतो. बरोबर घेतलेलं दूध आणि अन्नपदार्थ त्या महिला व अर्भकासाठी ठेवून स्कॉफिल्ड तिथून निघून जातो. फार काळ थांबून राहणं त्याला परवडणारं नसतं.

'माणूस' म्हणून एकमेकांच्या भावना जाणणारे आणि मूकपणे, फक्त कृतीतून व्यक्त होऊन सकारात्मक प्रतिसाद देणारे अनेक प्रसंग चित्रपटात लाजबाब आहेत!

अजून स्कॉफिल्डवरची संकटं कमी झालेली नसतात. जर्मन सैनिक त्याच्या मागावर असतात. त्यांच्यापासून वाचण्यासाठी स्कॉफिल्ड नदीच्या प्रवाहात उडी घेतो. वाटेत लागणारा धबधबा पार करत, वेगवान पाण्याच्या प्रवाहाशी अथक सामना करत तो नदीकिनारी पोहोचतो. अखेर तेथील जंगलात त्याला डिव्हेनशायर बटालियनची तुकडी दिसते, तेव्हा सकाळ झालेली असते! अतिशय दमलेल्या, गलितगात्र झालेल्या स्कॉफिल्डच्या चेहेऱ्यावर समाधान पसरतं.

त्याला ब्लेकच्या मोठ्या भावाला– जोसेफला, शोधून ब्लेकची अंगठी आणि ब्लेकच्या आईला पत्र लिहून द्यायचं असतं. त्याआधी कर्नल मॅकॅन्झीला गाठायचं असतं. जीवापाड जपलेला आदेशाचा कागद कर्नलला सुपूर्त करायचा असतो. त्यासाठी बंकरमध्ये असलेल्या सैनिकांच्या लाटेला ओलांडत, त्याला वाट काढावी लागणार असते. आणि आता तर तोफांचे आणि गोळ्यांचे आवाज सुरूदेखील झालेले असतात... पुढे??

मॅकॅन्झीपर्यंत तो आदेश स्कॉफिल्ड पोहोचवू शकतो? सुरू झालेला हल्ला थोपवू शकतो? सैनिकांचे प्राण वाचवू शकतो? जोसेफ ब्लेकला स्कॉफिल्ड शोधून काढू शकतो? एव्हाना तुमची उत्सुकता शिगेला पोहोचली असेल; पण ते प्रत्यक्ष पाहाणं आणि अनुभवणं यातच चित्रपटाचं सामर्थ्य दडलेलं आहे!

युद्धपट असूनदेखील भावभावनांचा मनोरम मिलाफ बघितल्याचं समाधान प्रेक्षकांना मिळतं. वास्तव आणि संवेदनशीलतेचा एकूण परिणाम प्रेक्षकांच्या मनावर खोलवर होतो. निर्माता, दिग्दर्शक आणि सहलेखक म्हणून सॅम मँडिसची कामगिरी उत्तम! सर्वात मोठं आव्हान होतं, ते तो कालखंड उभं करण्याचं! कलादिग्दर्शक, छायाचित्रकार यांच्या मदतीनं मँडिस यांनी ते आव्हान लीलया पेललं आहे! चित्रीकरणातील सलगतेचा निर्माण केलेला आभास, पार्श्वसंगीताचा सुयोग्य वापर आणि वातावरण निर्मिती ही चित्रपटाची जमेची बाजू आहे. जॉर्ज मॅके (स्कॉफिल्ड) आणि डीन चॅपमॅन (टॉम ब्लेक) या कलाकारांची व सहकलाकारांची मिळालेली योग्य साथ, या सर्वांमुळे त्या कालखंडाचा एक माहोल तयार होतो.

दुसऱ्या महायुद्धावर आधारित जेवढे चित्रपट झाले त्या तुलनेने पहिल्या महायुद्धावर खूपच कमी चित्रपटांची निर्मिती झाली. जानेवारी २०१९ मध्ये प्रदर्शित झालेला, '३ ऑस्कर ॲवॉर्ड' मिळालेला चुकवू नये असाच हा चित्रपट! नक्की मिळवा आणि पाहा!!

●●●

**– शिल्पा कुलकर्णी**
सी–२०४ पाटे संस्कृती,
सहकारनगर नं. २ , पुणे 411009



**वार्षिक प्रायोजक – • श्री. सागर सुराणा, पुणे • श्री. निखिल आपटे, पुणे**
**• श्री. गिरीश पळसकर, बंगळुरु** – कै. शरद पळसकर स्मृतिप्रीत्यर्थ.

# छात्र प्रबोधन

सौर चैत्र शके १९४२। इ.स.२०२० । वासंतिक विशेषांक

## धम्माल पत्त्यांचे खेळ – भेट पुस्तिका



आज आपण पत्त्यांचे विविध खेळ कसे खेळायचे, हे समजून घेणार आहोत. या सुट्टीमध्ये तुम्ही हे खेळ समजून घेऊन खेळावेत आणि शक्य झाल्यास स्वतःही नवीन खेळ तयार करावेत, अशी अपेक्षा!

### ♦ खेळ : १ - तेराची जोडी ♦

**खेळाडू :** २ ते ४ **पत्त्यांचे कॅट :** १ किंवा २

**खेळाचे नियम :** १) पत्त्यांच्या कॅटमधून दश्शी, गुलाम, राणी व राजा ही पाने बाजूला काढून ठेवा. एक्क्याची किंमत एक असेल.

२) पत्ते पिसून प्रत्येक खेळाडूला आठ पत्ते वाटा. उर्वरित पत्ते मध्यभागी गठ्ठा करून ठेवा.

३) खेळाडूंनी एकाच प्रकारचे इस्पिक किंवा किलवर किंवा चौकट किंवा बदाम यांचे चार पत्ते हातात असे गोळा करायचे की, त्यांची बेरीज तेरा यायला हवी. जिंकण्यासाठी खेळाडूला असे दोन संच तयार करावे लागतील.

४) पहिला खेळाडू मध्यभागी ठेवलेल्या पत्त्यांच्या गठ्ठ्यातून एक पत्ता उचलेल. त्याला तो पत्ता हवा असल्यास तो हातात ठेवील व हातातला नको असलेला एक पत्ता खाली टाकेल. पुढच्या खेळाडूला आधीच्या खेळाडूने टाकलेला पत्ता हवा असे, तर तो खेळाडू तो पत्ता उचलेल; आणि तो पत्ता नको असेल, तर पत्त्याच्या गठ्ठ्यातून एक पत्ता घेईल व पुन्हा पहिल्या खेळाडूप्रमाणे खेळ पुढे चालू ठेवेल.

५) जोपर्यंत कोणाही एका खेळाडूचे तेरा बेरीज असलेले चार पत्त्यांचे दोन संच तयार होत नाहीत तोपर्यंत खेळ चालू ठेवावा. प्रत्येक वेळी एक पत्ता घेतला की हातातला एक पत्ता खाली टाकलाच पाहिजे, म्हणजे कोणत्याही वेळी प्रत्येकाच्या हातामध्ये आठच पत्ते असतील... सुरू करा खेळ!



### ♣ खेळ : २ - जजमेंट ♣

**खेळाडू :** ३ ते १० **पत्त्यांचे कॅट :** ६ खेळाडूंपर्यंत १ कॅट, ६ पेक्षा जास्त खेळाडू असल्यास २ कॅट

**खेळाचे नियम :** १) कुणीही एकाने पत्ते पिसून जेवढे खेळाडू असतील, त्या सर्वांना एक एक करत पत्ते वाटायचे. सर्वांना समान संख्येने पत्ते येतील, असे पाहायचे. शिल्लक राहिलेले पत्ते न पाहता बाजूला ठेवून द्यायचे.

२) प्रत्येक डावासाठी हुकूम ठरलेला असतो. त्याचा क्रम पुढीलप्रमाणे– **इस्पीक, बदाम, किलवर आणि चौकट.**

३) त्या-त्या डावाचा हुकूम समजून घेऊन त्यानुसार आपली पाने पाहून आपले किती हात होऊ शकतील, असा अंदाज प्रत्येकाने सांगायचा. एकाने कागदावर तक्ता तयार करून त्यामध्ये प्रत्येकाच्या नावाखाली प्रत्येकाच्या हातांचा आकडा लिहावा. डावीकडे डावांचे क्रमांक असतील.

४) ज्याने सर्वात जास्त हात होतील असे सांगितले असेल, त्याने खेळायला सुरुवात करायची. असे एकापेक्षा जास्त खेळाडू असल्यास ज्याने पहिल्यांदा सांगितले असेल त्याने उतारी करायची.

५) बाकी सर्व खेळ ५-३-२ किंवा लॅडीजप्रमाणेच खेळायचा आहे. खेळ संपल्यावर कोणाचे किती हात झाले, ते मोजायचे. खेळाच्या सुरुवातीला सांगितलेल्या हातांप्रमाणे ज्यांचे हात झाले असतील, त्यांच्या तक्त्यातील अंकाच्यामागे २ लिहायचे; उदाहरणार्थ : ४ हात होतील असे सांगितले असतील आणि ४ हात झाले असतील तर त्याचे २४ गुण. पण सांगितल्याप्रमाणे झाले नसतील तर, सांगितल्यापेक्षा जेवढे कमी किंवा जास्त हात झाले असतील त्यानुसार सांगितलेल्या आकड्याच्या मागे –१ किंवा –२ असे लिहायचे. २ हात सांगितले व एकच झाला तर –१२, ० हात सांगितले आणि २ हात झाले तर –२० याप्रमाणे प्रत्येकाचे गुण नोंदवायचे.

६) प्रत्येक डावात एकेकाने क्रमाने पत्ते पिसायचे. प्रत्येक वेळी आधी बाहेर काढून ठेवलेले पत्ते मिसळून पत्ते पिसायचे. प्रत्येक डावात आधीच्या डावापेक्षा एक-एक पत्ता प्रत्येकाला कमी वाटायचा व राहिलेले पत्ते न पाहता बाजूला ठेवून द्यायचे. म्हणजे सुरुवातीला प्रत्येकाला ८ पत्ते वाटले असतील, तर नंतरच्या डावात ७ पत्ते वाटायचे. मग त्यांनतरच्या डावात ६, मग ५ असे पत्ते वाटायचे.

शेवटच्या डावात प्रत्येकाकडे एकच पत्ता येईल. प्रत्येक वेळी किती हात होतील, ते प्रत्येकाने सांगायचे, ते नोंदवून ठेवायचे. डाव झाला की झालेल्या हातांनुसार गुण लिहायचे. सर्वात शेवटी प्रत्येकाच्या सर्व डावातल्या गुणांची बेरीज करायची. ज्या खेळाडूला सर्वात जास्त गुण मिळाले असतील तो/ती जिंकणार.

७) मिळालेल्या पत्त्यांच्या आधारे अंदाज बांधता येणे आणि सांगितलेल्या अंदाजानुसार हात होण्यासाठी, आवश्यक ते डावपेच खेळता येणे महत्त्वाचे. करा खेळायला सुरुवात!!

## ♥ खेळ : ३ - ३०४ ♥

**खेळाडू :** ४ ते ६ **पत्त्यांचे कॅट :** १ कॅट

**खेळाचे नियम :** १) या खेळामध्ये प्रत्येक पत्त्याला पुढीलप्रमाणे किंमत असणार आहे. **गुलाम–३०, नव्वी–२०, एक्का–११, दश्शी –१०, राजा– ३, राणी – २,** उरलेल्या सर्व पत्त्यांना शून्य किंमत असेल तथापि हात होण्यासाठी सत्तीपेक्षा अठ्ठी भारी, पंजीपेक्षा छक्की भारी या क्रमाने असेल. एका कॅटमधील सर्व पत्त्यांची एकूण किंमत ३०४ होते, म्हणून खेळाचे नाव ३०४!

२) ४ जण खेळणार असतील तर दुर्री ते छक्की हे पत्ते बाजूला काढून बाकीचे ३२ पत्ते घ्यायचे. ६ जण खेळणार असतील तर ४ दुर्‍या बाजूला काढून ४८ पत्ते घ्यायचे. एकाने पत्ते पिसून प्रत्येकी ४ पाने वाटायची.

३) प्रत्येकाने पत्ते पाहायचे. हातातील पत्त्यांच्या किंमती व एकाच प्रकारचे किती पत्ते आपल्या हातात आहेत त्याचा अंदाज घेऊन प्रत्येकाने बोली बोलायची असते. प्रत्यक्षात अजून ४ पत्ते प्रत्येकाला मिळणार आहेत आणि एक भिडू मागता येणार आहे, हे लक्षात घेऊन अंदाज घेत बोली बोलायची असते.

४) सुरुवात पत्ते पिसणार्‍याच्या उजव्या हाताला बसलेल्या खेळाडूपासून करायची. त्याने १५० पासून पुढे बोली बोलायची. त्यापुढील प्रत्येकाने ५ किंवा १० च्या पटीत बोली वाढवत जायची. पत्ते अगदीच बेताचे असतील तर तुम्ही पास म्हणू शकता. एकदा पास बोललात की, त्या डावात तुम्हाला परत बोली बोलता येत नाही.

५) ज्या खेळाडूच्या बोलीवर उरलेले सगळे 'पास' म्हणतील, त्याने हुकूम सांगायचा. मग उरलेले ४ पत्ते प्रत्येकाला वाटायचे.



६) आता ज्याने बोली बोलली आहे त्याने हातातील पत्ते पाहून, बोली पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे नसलेल्या कोणत्या पत्त्याचा उपयोग होईल; हे पाहून तो पत्ता ज्याच्याकडे असेल त्याला भिडू म्हणून मागायचे. (उदा. बदाम गोटू भिडू.) ज्याच्याकडे तो पत्ता असेल, त्याने मात्र लगेच सांगायचे नाही. ४ जण खेळत असतील तर एक भिडू आणि ६ जण खेळत असतील तर २ भिडू मागता येतात.

७) आता बोली बोलणार्‍याने खेळायला सुरुवात करायची. सगळा खेळ लॅडीज सारखाच खेळायचा आहे, फक्त किंमतीनुसार जास्त किंमत असलेल्या पत्त्याचा हात होणार!

८) बोली बोलणार्‍याने त्याला योग्य वाटेल त्यावेळी त्याने जो पत्ता भिडू म्हणून मागितला आहे त्याला 'भिडू दाखवा' असे सांगून योग्य उतारी करायची. ज्याच्याकडे तो पत्ता असेल त्याने त्या उतारीवर तो पत्ता टाकायचा, म्हणजे सगळ्यांना कळेल की बोली बोलणार्‍याचा भिडू कोण आहे! आता त्या दोघांनी मिळून बोली पूर्ण करायची आहे. 'भिडू दाखवा' असे म्हणण्यापूर्वीच, जर दुसर्‍या कोणत्या उतारीवर तो पत्ता टाकायची वेळ आली, तर मात्र बोली बोलणार्‍याला एकट्यालाच बोली पूर्ण करावी लागते. उरलेले तीन जण त्यावेळी एकत्रितपणे खेळतात. (उदा. बदाम गोटू हा भिडू म्हणू मागितला आहे; पण दुसर्‍याने कोणीतरी बदामची उतारी केली. ज्याच्याकडे बदाम गोटू आहे त्याच्याकडे तेवढा एकच बदामचा पत्ता असेल तर त्याला बदाम गोटूच टाकावा लागेल. अशावेळी बोली बोलणार्‍याला भिडूशिवाय खेळावे लागते. पण बदाम गोटू असलेल्या खेळाडूकडे बदामचा अजून एक पत्ता असेल तर 'भिडू दाखवा' असे म्हटले नसल्यामुळे तो बदाम गोटू टाकू शकत नाही.) तसेच 'भिडू दाखव' असे म्हटल्यावर, जर तो हात बोली बोलणार्‍याचा वा त्याच्या भिडूचा नाही झाला, तरी देखील बोली बोलणार्‍याला एकट्यानेच खेळावे लागते!

९) खेळामध्ये एखाद्याकडे एकाच प्रकारचे राजा–राणीचे जोडपे असेल, तर त्याचा एक हात झाल्यावर त्याने ते दाखवायचे. अश्यावेळी ते जोडपे बोली बोलणार्‍याकडे किंवा त्याच्या भिडूकडे असेल, तर त्यांच्या बोलीतून २० कमी होतात आणि उलट असेल, तर त्यांच्या बोलीत २० वाढतात. जर हुकमाचे जोडपे असेल, तर बोली २० ऐवजी ४० ने कमी किंवा जास्त होते. तसेच डावातला शेवटचा हात ज्यांचा होईल, त्यानुसार बोलीमध्ये १० कमी किंवा जास्त होतात.

१०) डाव संपल्यावर बोली बोलणाऱ्याने त्याचे व त्याच्या भिडूकडचे हात एकत्र करून त्यातील पत्त्यांच्या किंमतीची बेरीज करायची असते. ती बेरीज जर बोलीएवढी किंवा त्यापेक्षा जास्त असेल, तर बोली बोलणाऱ्याला व त्याच्या भिडूला एकेक गुण मिळतो आणि कमी असेल तर उणे एक गुण मिळतो. हे गुण कागदावर नोंदवून ठेवायचे.

११) सुरुवातीला वाटलेल्या ४ पानांमध्येच जर कोणाला असे वाटले की त्याचे चारही हात होऊ शकतील, तर तो ३०४ ची बोली बोलू शकतो. त्यावेळी बोली बोलणार एकटा असतो व उरलेले सगळे त्याच्या विरुद्ध! बोली बोलणाऱ्याचे चारही हात झाले, तर त्याला २ गुण आणि नाही झाले तर वजा २ गुण.

१२) ८ पाने मिळाल्यावर बोली बोलणाऱ्याला किंवा अन्य कोणाला भिडू मागून सर्व हात होतील, असे वाटले तर तो खेळाडू ३०४ ची बोली बोलू शकतो व हवा तो भिडू मागू शकतो. तोच उतारी करतो. अश्यावेळी बोली बोलणाऱ्याचे (भिडूसह) सर्व हात झाले तर दोघांनाही २ गुण मिळतात आणि नाही झाले तर दोघांनाही वजा २ गुण मिळतात.

१३) बोली बोलणाऱ्याचे व त्याच्या भिडूचेच गुण कमी किंवा जास्त होतात उरलेल्यांचे नाही, हे लक्षात ठेवावे. कोणत्याही खेळाडूला ५ गुण मिळाले की, तो जिंकतो आणि खेळ संपतो.

## ♦ खेळ : ४ - भारी उनो ♦

**खेळाडू :** २ ते ४ **पत्त्यांचे कॅट :** कॅट – १ किंवा २

**खेळाचे नियम :** १) पत्ते पिसून प्रत्येक खेळाडूला १०-१० पत्ते वाटायचे. राहिलेल्या पत्त्यांचा गठ्ठा मध्यभागी ठेवायचा. त्यातील पहिला पत्ता काढून सुलटा करून गठ्ठ्याशेजारी ठेवायचा.

२) या खेळात एक्का, राजा, राणी आणि गुलाम ही भारी पाने आहेत व त्यांना विशेष अधिकार आहेत. एक्का टाकल्यावर पुढच्या खेळाडूचा एक डाव बाद होतो. राजा खेळल्यावर खेळाची दिशा उलटी होते. राणी खेळल्यावर पुढच्या खेळाडूला गठ्ठ्यातून ४ पाने उचलावी लागतात. तर गुलाम खेळल्यावर प्रकार बदलता येतो. (उदा. खालचा पत्ता इस्पिक असेल तर तुम्ही बदाम किंवा किलवर किंवा चौकट असा प्रकार बदलू शकता) व त्याचवेळी पुढच्याला गठ्ठ्यातून २ पानेही उचलावी लागतात. एक्का, राजा, राणी हे त्या त्या प्रकारावरच (उदा. इस्पिक वर इस्पिकच) टाकता येतात. गुलाम मात्र कोणत्याही पत्त्यावर टाकता येतो.

३) आता उनोप्रमाणेच खेळायला सुरुवात करायची. पत्ते वाटणाऱ्याच्या उजवीकडच्या खेळाडूने खेळायला सुरुवात करायची. मध्यभागी सुलटे करून ठेवलेल्या पानाच्या प्रकारानुसार (उदा. बदामवर बदाम) अथवा संख्येनुसार (उदा. अठ्ठीवर अठ्ठी) हातात पत्ता असेल तर टाकायचा. नसेल तर गठ्ठ्यातून एक पान उचलायचे. ते वरीलप्रमाणे टाकता येणे शक्य असेल, तर टाकायचे नाहीतर हातात ठेवायचे. याचप्रमाणे क्रमाने प्रत्येकाने खेळत जायचे.

४) विशेष अधिकार असलेली पाने (एक्का, राजा, राणी, गुलाम) केव्हा वापरायची हे प्रत्येकाने अंदाज घेऊन ठरवायचे, मात्र विशेष अधिकार असलेले पान सर्वात शेवटचे पान म्हणून टाकता येणार नाहीत. चुकून शेवटचे पान विशेष अधिकाराचे असले तर त्याला गठ्ठ्यातून एक पान उचलावे लागेल आणि मग परत खेळावे लागेल.

५) ज्या वेळी कोणाकडे हातात एकच पान शिल्लक असेल त्या प्रत्येकवेळी त्याने 'उनो' असे मोठ्याने सांगायचे. असे सांगितले नाही, तर त्याला गठ्ठ्यातून २ पाने दंड म्हणून उचलावी लागतील!

६) ज्याच्या हातात शून्य पाने शिल्लक राहातील तो जिंकला. २ पेक्षा जास्त जण खेळत असतील तर पहिल्यांदा ज्याची सर्व पाने संपतील त्याला ५ गुण मिळतील, त्यानंतरच्याला ३ गुण व त्यानंतरच्याला १ गुण मिळेल. पहिला सुटला तरी शेवटचा खेळाडू शिल्लक असेपर्यंत खेळ चालू ठेवायचा...

## ♥ खेळ ५ - बदाम सात ♥

**खेळाडू :** ४ ते १० **पत्त्यांचे कॅट :** कॅट १ किंवा २

**खेळाचे नियम :**

१) एकाने पत्ते पिसून सर्व खेळाडूंना एक-एक करत सर्व पत्ते वाटायचे. सर्वांनी मिळालेले पत्ते पाहायचे.

२) ज्याच्याकडे बदाम सत्ती असेल त्याने ती मध्यभागी सर्वांना दिसेल अशी टाकायची. मग त्याच्या उजव्या बाजूला बसलेल्या खेळाडूपासून पुढे क्रमाने खेळायला सुरुवात करायची.

३) या खेळामध्ये सत्तीच्या खालच्या बाजूला क्रमाने छक्की, पंजी, चौकी, तिर्री, दुर्री, एक्का असे पत्ते लावायचे असतात; तर वरच्या बाजूस अठ्ठी, नव्वी, दश्शी, गुलाम, राणी व राजा या क्रमाने पत्ते लावायचे असतात. त्या-त्या प्रकारच्या पत्त्यांवर त्याच प्रकारचे व त्याच क्रमाने पत्ते लावायचे असतात. (उदा. बदाम वर बदाम, सत्तीवर अठ्ठी किंवा छक्की) त्या-त्या सत्तीच्या वर व खाली क्रमाने आधीचे पत्ते असल्याशिवाय पुढचे पत्ते टाकता येत नाहीत. तुमच्या हातात खाली लावण्यासाठी सत्ती किंवा वरील नियमानुसार पत्ता असेल तर तो तुम्ही टाकायचा, एकावेळी एकच! आणि नसेल तर तुम्ही 'पास' म्हणायचे म्हणजे पुढचा खेळेल.

४) खेळताना आपले भारी पत्ते कमी करत जायचे आणि इतरांचे मात्र अडवायचे, अशारितीने डावपेच आखायचे. ज्याचे सर्व पत्ते सुटण्याची खात्री असेल त्याने शेवटची तीन पाने किंवा शेवटचे पान शिल्लक असे सर्वांना सूचित करायचे.

५) ज्याची सर्व पाने पहिल्यांदा संपतील, त्याने खालचे सर्व पत्ते गोळा करायचे, त्यानंतर कोणीही पत्ते टाकू शकत नाही. आता उरलेल्या प्रत्येकाच्या हातामध्ये जेवढी पाने असतील, त्यांच्या किंमतीची बेरीज करायची (एक्का -१ दुर्री ते दश्शी संख्येप्रमाणे, गुलाम ११, राणी १२, राजा १३) व ती एका कागदावर प्रत्येकाच्या नावाखाली लिहून ठेवायची. असे सात डाव खेळायचे. प्रत्येक डावात हातात शिल्लक राहिलेल्या पत्त्यांच्या किमतीची बेरीज करून ती प्रत्येकाच्या नावाखाली क्रमाने नोंदवायची. सात डाव पूर्ण झाले की, सर्व किमतींची बेरीज करायची. ज्याचे सर्वात कमी गुण तो खेळाडू जिंकला! तर ज्याचे सर्वात जास्त गुण त्याने सर्वांना छोटीशी पार्टी द्यायची किंवा सर्वांसमोर एखादी कृती (गाणे म्हणणे, नृत्य करणे, भाषण करणे इत्यादी) सादर करायची.

## ♠ खेळ : ६ - झब्बू ♠

**खेळाडू :** ४ ते १० **पत्त्यांचे कॅट :** ६ खेळाडूंपर्यंत १ कॅट, ६ पेक्षा जास्त खेळाडू असल्यास २ कॅट

**खेळाचे नियम :** १) सर्व खेळाडूंना क्रमाने एकेक करून पत्त्यांची पाने वाटावीत.

२) या खेळात एक्का सर्वात भारी असतो. त्याखालोखाल राजा, राणी, गोटू, दश्शी असे दुर्रीपर्यंत उतरत्या क्रमाने असतात.

कुमारांसाठी ६० पेक्षा अधिक संग्राह्य पुस्तके प्रकाशित! अवश्य संग्रही ठेवा!!



३) पत्ते पाहून, ज्याच्याकडे इस्पिकचा एक्का असेल त्याने तो टाकून खेळ सुरू करावा. त्यानंतर ओळीने पुढील खेळाडूंनी इस्पिकचे आपल्याजवळ असणारे पान त्यावर टाकावे.

४) जास्त भारी पान ज्याचे असेल त्याचा 'हात' होतो. 'हात' झालेली पाने बाजूला ठेवून द्यावीत. ज्याचा 'हात' झाला त्याने पुढील उतारी करावी.

५) एखाद्याकडे उतारी केलेले पान नसेल तर त्याने त्याच्याकडील कोणत्याही प्रकारातील सर्वात भारी पान झब्बू म्हणून टाकावे. हा झाला **'एक पानी' झब्बू!** कोणत्याही एकाच प्रकारातील एक पान स्वत:कडे ठेवून उरलेल्या सर्व पानांचा गड्डाच झब्बू म्हणून दिला तर तो झाला **'गड्डा झब्बू'**. खाली असलेल्या पानांमध्ये सर्वात भारी पान ज्याने टाकले असेल, त्याने ती सगळी पाने उचलून स्वत:कडे घ्यावीत. ज्याने झब्बू दिला त्याने पुढील उतारी करावी.

६) अशाप्रकारे खेळताना ज्याची पाने सर्वात आधी संपतील तो विजयी होऊन सुटेल. एकेकजण सर्व पाने संपली की खेळातून बाहेर पडेल. व उर्वरित खेळाडू खेळ पुढे चालू ठेवतील. सर्वात शेवटी ज्याच्याकडे पाने उरतील तो हरेल. त्याने सर्वांसमोर एखादी कृती करावी. (गाणे, कविता, नक्कल इ.)

**'बेरीज' झब्बू :** वरील झब्बूमध्ये पाने वाटतो त्याऐवजी मध्यभागी पत्त्यांचा गठ्ठा ठेवला जातो. प्रत्येक खेळाडूने त्यातून एकेक पान उचलायचे असते. पहिल्या खेळाडूने त्यातील १ पान उचलून खाली टाकयचं मग दुसऱ्याने गठ्ठ्यातून पान उचलायचे ते खालील पानाच्या किंमतीएवढे असेल तर त्याने ते पान उचलून दोन्ही पाने स्वत:कडे ठेवायची. नसेल तर पान खाली टाकायचं. यापुढे प्रत्येक खेळाडूने उचललेल्या पानाला खाली टाकलेल्या पानांपैकी समान पान किंवा त्या पानांच्या अंकांइतकी बेरीज होणारी पाने असतील, तर इतर खेळाडूंनी लक्ष ठेवून ती त्या खेळाडूला घ्यायला लावावीत. उचललेल्या पानाला समान पान किंवा त्याच्याइतकी बेरीज होईल अशी पाने नसतील, तर ते पान खाली टाकावे व पुढील खेळाडूने गठ्ठ्यातील पान उचलावे. गठ्ठ्यातील शेवटचे पान उचलणाऱ्या खेळाडूला खाली असलेली सर्व पाने घ्यावी लागतात. आता प्रत्येकाच्या हातात असलेल्या पानांनुसार झब्बू खेळायला सुरुवात करायची. शेवटची पाने उचलणाऱ्याने पहिली उतारी करायची.

**शब्दांकन : महेन्द्र सेठिया, अनादी ढवळे**


कुमारांसाठी नावीन्यपूर्ण स्पर्धा, मेळावे, कार्यशाळा यांचे आयोजन! नक्की सहभागी व्हा!!

विज्ञान प्रयोग

# उडी मारणारा बेडूक

**सहित्य** - चार-पाच रिंगचुंबक, रबराचा चौकोनी तुकडा (जुन्या रबरी चपलेचा तुकडा चालेल), *स्ट्रॉ* इत्यादी. (आकृती १ मध्ये दाखविल्याप्रमाणे)


आकृती क्र. १



**कृती** -

१) रबराचा एक चौकोनी तुकडा घ्या आणि त्याच्यामध्ये एक *स्ट्रॉ* खोचून उभी करा.

२) या स्ट्रॉमध्ये आकृती क्र. २ मध्ये दाखविल्याप्रमाणे चार रिंगचुंबक टाका. खालच्या चुंबकाला वरचे चुंबक प्रतिकर्षित करेल अशी रिंगचुंबकाची रचना करा.




आकृती क्र. २

३) आपल्याला *स्प्रिंगसारखी* रचना तयार झालेली दिसेल. म्हणजेच वरचे चुंबक खाली दाबायचा प्रयत्न केला तर खालचे रिंग चुंबक त्याला वर ढकलेल.

४) एका कार्डशीटवर बेडकाचे चित्र काढा आणि आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे त्याच्यामागे एक जाड *स्ट्रॉचा* तुकडा चिकटवा.

५) आता हा बेडूक उभ्या *स्ट्रॉमध्ये* घाला.

आकृती क्र. ३



### काय घडते?

- आपण जर का बेडकाला खाली दाबले तर बेडूक वर येईल.


### असे का घडते?

- चुंबकाच्या सजातीय ध्रुवांमध्ये प्रतिकर्षण असते त्यामुळे चुंबक एकमेकांपासून दूर जातात.

### करून बघा

रिंगचुंबकाची संख्या आणि बेडूक किती अंतर वर जातो यामधील काही संबंध शोधता येईल का? रिंग चुंबकाची संख्या वाढवून हा प्रयोग करून बघा.

आकृती क्र. ४



(पूर्वप्रसिद्धी सुबोध ग्रामीण द्वैमासिक मार्च २०१७)

**(संकलन)**



**माहिती मिळवा : भांगडा - पंजाब :** ढोल आणि ताल यावर आधारित लोकनृत्य.

**वार्षिक प्रायोजक -** • **सौ. प्राची व श्री. अमर परांजपे - सांगली**
• **सौ. मानसी मराठे, पुणे**

# क्या है ये करोना?

- डॉ. प्रदीप आवटे



''इकडे जाऊ नको, तिकडे जाऊ नको, अरे, काय चाललंय काय हे?'' रितेश वैतागून म्हणाला.

''नाही तर काय, *ये करोना, वो करोना.. क्या है ये कोरोना?''* मुक्तानेही रितेशची री ओढली.

दोन्ही पोरं घरात बसून जाम कंटाळून गेली होती. शाळा बंद, *क्लास* बंद, समोरच्या *ग्राऊंड*ला भलामोठ्ठा टाळा, कुणाच्या घरी जायची पंचाईत. *करे तो करे क्या?* म्हणून तर मुक्ता रागारागात विचारत होती, *''क्या है ये करोना?''*

मुक्ताचा काका रोहन हा डॉक्टर माणूस. त्याने आज मुलांशी बोलायचं ठरवलंच होतं!

''मुक्ता, तुला *व्हायरस* माहितीये, *व्हायरस* ?''

''*कॉम्प्युटरवाला?''* रितेश म्हणाला आणि सगळेच हसले.

''अरे, हसण्यासारखं काय आहे त्याच्यात! हा *व्हायरस* घुसला ना *कॉम्प्युटर*मध्ये की *पीसी हँग*च होतो बाबा. सगळ्या *फाईल करप्ट* होतात,'' रितेश रागारागात म्हणाला.

''बरोबरऽऽ रे, मी *व्हायरस*च्याच बाबतीत बोलतोय; पण थोड्या वेगळ्या आणि अधिक महत्त्वाच्या *व्हायरसबद्दल! व्हायरस* म्हणजे विषाणू. काही वेळा हे विषाणू माणसाच्या शरीरात घुसतात आणि माणसाच्या शरीरात काम करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था *हँग* होऊन जातात, नीट काम करेनाशा होतात.'' आता पोरं कान टवकारून डॉक्टरकाकाचं ऐकू लागली.

''विषाणू... खरं म्हणजे त्यांना सजीव म्हणणं पण अवघड आहे. त्यांना पेशीच नसते. स्वतःची वाढ करण्याकरिता त्यांना सतत एका जिवंत पेशीची गरज असते. आणि म्हणून ते सतत एका नव्या पेशीच्या शोधात असतात. आणि असतात तर इतके छोटे की, निव्वळ डोळ्यांनी तर सोडा साध्या *मायक्रोस्कोपखाली* पण विषाणू दिसू शकत नाहीत. त्यांना पाहण्यासाठी *स्पेशल* म्हणजे *इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप* लागतो.''

''हंऽऽ पण करोना काय आहे ?''

''करोनासुद्धा एक विषाणूच आहे. सारख्या गुणधर्माचे विषाणू आपण एका कुटुंबात समाविष्ट करतो. तसं हे एक विषाणूंचे कुटुंब आहे 'करोना' नावाचं! त्यांचा आकार राजमुकुटासारखा दिसतो. मुकुट म्हणजे इंग्रजीत *'क्राऊन'*. त्यावरून या विषाणूला नाव पडले 'करोना'. करोना विषाणू आपल्याला पूर्वीपासून माहीत आहेत; पण मागच्या डिसेंबरमध्ये चीनमधील वुहान शहरात हा नवा करोना विषाणू सापडला. करोना कुटुंबातील नवा मेंबर,'' असं म्हणून डॉक्टरकाका किंचित हसला.

''हा विषाणू नव्याने आला म्हणजे इतके दिवस कुठं होता?'' ढमूताई बोलल्या.

''करोना विषाणूचे मूळ स्थान प्राण्यांमध्ये आहे. वटवाघूळ हे त्यांचे वसतिस्थान. मग वटवाघळातून ते माणसात कसे येतात, असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, नाही का? पर्यावरणाची होणारी हानी, जंगलतोड अशा अनेक कारणांमुळे आपण प्राण्यांच्या मूळ घरात घुसखोरी करतो. यातूनच आपण जणू काही खिडकी उघडी ठेवून प्राणिजगतातील विषाणूंना मानवी वस्तीत येण्याचे आमंत्रण देत असतो. शिवाय चीनमध्येच हे का घडलं, यालाही काही कारणं आहेत.

जगाची सुमारे दीड अब्ज लोकसंख्या आणि एकूण जगाच्या निम्मे पशुधन चीनमध्ये आहे. चीनमधील खाद्यसंस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. या प्रदेशातील मांसाहारातील वैविध्य लक्षणीय आहे. जवळपास एकशेवीस वेगवेगळे प्राणी ही मंडळी आपल्या आहारात घेतात. प्राण्यांचे रक्त , मांस पुरेशी काळजी न घेता हाताळल्याने असे विषाणू मानवी जगतात शिरकाव करण्याचे अपघात घडण्याची शक्यता वाढते. प्राणी, पर्यावरण आणि माणूस या सगळ्यांचं आरोग्य असं एकमेकांना बांधलेलं आहे.''

''बाप रे!'' रितेशने आ वासला.

''तर ते असो, अशाच काही अपघातामुळे या नवीन करोना विषाणूचा जन्म झाला आहे. सध्या त्याच्यामुळे जगभर करोनाची म्हणजे 'कोविड - १९' या आजाराची साथ पसरली आहे. ताप, खोकला, सर्दी अशी सर्वसाधारण लक्षणं असतात या आजाराची. ऐशी टक्के लोकांना विशेष काहीच होत नाही, अगदी दवाखान्यात न जाता ते बरे होतात; पण काही जणांना मात्र गंभीर आजार होतो. त्यांच्या फुप्फुसापर्यंत हा विषाणू पोहोचतो. मग न्युमोनिया होतो, श्वास घ्यायला त्रास होऊ लागतो. काही जणांचा यात मृत्यूदेखील होतो. सध्या चीननंतर इटली, स्पेन अशा युरोपातील देशांमध्ये आणि पाठोपाठ अमेरिकेमध्ये हा आजार खूप वेगाने पसरतो आहे. भारतात देखील अनेक रुग्ण सापडले आहेत.''

''पण काका, हा करोना आजार पसरतो कसा?''

''अगदी महत्त्वाचा प्रश्न विचारलास बघ! ज्याला हा आजार झाला आहे - तो शिंकताना, खोकताना थुंकीचे जे थेंब उडतात त्यात हा विषाणू असतो. हे थेंब घरात, कार्यालयात, जिथं कुठं आपण असू तिथल्या *टेबल, टिपॉय, की-बोर्ड* अशा वेगवेगळ्या पृष्ठभागावर पडतात. तिथं येणाऱ्या जाणाऱ्याचा त्याला हात लागला की, हे विषाणू त्याच्या हाताला चिकटतात आणि मग हाताने चेहरा चोळताना नाक, तोंड, डोळे यांच्या अभित्वचेमार्गे ते आपल्या शरीरात प्रवेश करतात. आता सांगा बरं, हा आजार आपल्याला होऊ नये म्हणून आपल्याला काय काळजी घ्यावी लागेल?''

''एकदम सोप्पं. हा विषाणू कसा पसरतो, हे आपल्याला माहीत आहे. ते सारे रस्ते बंद करायचे.. सो *ईझी,*'' मुक्ता म्हणाली.

''*येस* म्हणजे.. *नंबर वन* - शिंकताना, खोकताना नाकातोंडावर रुमाल धरा, रुमाल नसेल तर स्वतःच्याच कोपरात शिंका. *नंबर टू*... आपले हात वारंवार धुवा. आणि हात कसे धुवायचे हे आम्हाला शाळेत शिकवलं आहे. साबण आणि पाण्याने किमान २० सेकंद हात धुतले पाहिजेत. पहिल्यांदा तळहात चोळावेत, मग तळहाताच्या मागील बाजू, मग बोटातील फटी, मग नखांची टोके तळहातावर घासावीत, मग दोन्ही हाताचे अंगठे आणि मग मनगट! बरोबर ना?'' रितेशने उत्साहाने हात धुवून दाखवला, लगेच तिथल्या तिथं.

''आणि महत्त्वाचं म्हणजे आपल्या घरातील *टेबल, टिपॉय* यांचे पृष्ठभाग आणि ज्या ठिकाणी सगळ्यांचा हात वारंवार लागतो... दाराचा *नॉब*... हे वारंवार पुसले पाहिजेत. आणि काही जणांना सतत चेहरा, डोळे, नाक चोळण्याची सवय असते, ती जरा कमी केली पाहिजे,'' मुक्ता बोलली.

''आणि हो *हॅन्डशेकही* नको. साधा भारतीय नमस्कार उत्तम!''

''सध्या या आजारावर कोणतेही औषध नाही, लस नाही आणि तो खूप वेगात पसरतो आहे. म्हणून आपल्यासारख्या देशांनी सारं काही बंद ठेवलं आहे. '*लॉक डाऊन*' - या विषाणूचा प्रसार थांबवण्याचा हा एक प्रभावी मार्ग आहे.''

''आपण एकमेकांमध्ये मिसळल्याने अनेकांना हा आजार होण्याची शक्यता वाढते. म्हणून तर घरी थांबणं, विनाकारण बाहेर न पडणं आवश्यक आहे.''



**माहिती मिळवा : गरबा - गुजरात :** देवी दुर्गेला समर्पित, गोलाकार फिरत केले जाणारे लोकनृत्य.

**वार्षिक प्रायोजक - ● डॉ. जयेश राहाळकर, पुणे ● श्री. संजय रिसबूड, पुणे ● श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

''अरे काका, आमच्या मोहिते सरांनी याच्यावर एक छान गाणे लिहिलं आहे,

**''शिवरायांचे मावळे आपण, स्मरू त्यांच्या नावा।**
**घरी बसून युद्ध जिंकू हे, करुनी गनिमी कावा।।''**

''व्वा, छानच!''

●●●


**डॉ. प्रदीप आवटे**
बी/३१, सोबा विहार, उजवी भुसारी, कोथरूड डेपो, पुणे -३८

**वाचूया**
**सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन**
**यांच्यातर्फे प्रकाशित**
**माहिती पुस्तिका – कोविड १९**

---

मुलांचे पान

# आमची *'ऑनलाईन'* शाळा!



जगभरात थैमान घालणारा करोना विषाणू पुण्यापर्यंत येऊन पोहोचला आणि सगळ्यावर निर्बंध आले. त्यातच शाळा आणि महाविद्यालयेसुद्धा बंद ठेवण्यात आली. सुरुवातीला जरा मज्जा वाटली. पण आता आपल्या शाळेचं काय? आमचा अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार? परीक्षा होणार की नाही? आता हे असं किती दिवस घरी बसायचं? आमच्या मनातले हे प्रश्न शाळेने चुटकीसरशी सोडवले. आणि आमची *ऑनलाईन* शाळा सुरू झाली.

Zoom App द्वारे आमची *ऑनलाईन* शाळा सुरू झाली. शाळेच्या वेळापत्रकाप्रमाणे आमचे नियमित *ऑनलाईन* तास होऊ लागले. या *ॲपमध्ये* शिक्षक आमच्याशी संवाद साधू शकतील, तसेच आम्हीही आमचे प्रश्न, शंका शिक्षकांना विचारू शकू अशीही व्यवस्था त्यात होती. फक्त विषयांचे तासच नाहीत तर अभिव्यक्तीच्या तासाला म्हणजे नृत्य, नाट्य, गायन, वादन, लेखन या तासांना देखील विविध विषयांवर आमची त्या-त्या शिक्षकांशी चर्चा होते. दररोज शाळा सुटली की दल भरते. त्यात आम्ही वेगवेगळ्या प्रकारचे व्यायाम करतो. मग त्याला तरी कसा खंड पडू देणार? आता रोज *ऑनलाईन* दलपण होत आहे. संध्याकाळी साडेपाच ते साडेसहा या वेळात ताईच्या सूचनेप्रमाणे घरी रोज संध्याकाळी वेगवेगळे चेतना व्यायाम, सूर्यनमस्कार, *सीटअप्स* असे व्यायामप्रकार होतात. दिवसभर *फोनवर* किंवा *लॅपटॉपवर* झालेल्या तासांनंतर डोळ्यांवर ताण येऊ नये म्हणून, आमचे डोळ्यांचे व्यायामही घेतले जातात.

आमच्या शाळेच्या या नवीन उपक्रमामुळे आपण शाळेतच आहोत की काय असेच वाटते. या *लॉकडाऊन* दरम्यान शाळेच्या तासिका आणि इतर उपक्रम यामुळे घरी बसून अजिबात कंटाळा येत नाही. दिवस कसा जातो ते कळतच नाही. दलाच्या तासाला व्यायाम केल्यामुळे आळसही जातो. रोज वेगळ्या खोलीत, वेगळ्या ठिकाणी, मला हव्या त्या जागी माझी शाळा भरते. आम्ही सगळ्या चाळीस मैत्रिणी *ऑनलाईन* का होईना रोज भेटत असतो. आमचे सगळे शिक्षक, प्राचार्य, दलाच्या ताया हे सगळेदेखील आमच्या या *ऑनलाईन* प्रवासात कायमच आमच्या बरोबर आहेत.

थोडेच दिवसात पुन्हा सगळं सुरळीत होईल. मग पुन्हा पहिल्यासारखे *रूटिन* सुरू होईल. पण करोनामुळे चाललेले आमचे हे *ऑनलाईन* शिक्षण कायमच आम्हाला प्रेरणा देणारे ठरेल. 'कितीही संकटे आली, तरी त्यातून मार्ग काढून शिकत राहायचे;' हीच अनुभवाची शिदोरी हे *ऑनलाईन* प्रशिक्षण आम्हाला देत राहील.

**कु. मृण्मयी बापट**, इ. ८वी, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे



वार्षिक प्रायोजक – ● श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे.
सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायं.), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

# कहाणी एका जिद्दीची

कथा

– सुहासिनी देशपांडे

ऐका प्रयत्नांती परमेश्वरा तुमची कहाणी. आटपाट नगर होतं. नगर कसलं? शे–पाचशे उंबऱ्यांचं गाव ते. एका बाजूला जेजुरी दुसऱ्या बाजूला सासवड यांच्यामध्ये आतल्या अंगाला दोन *फर्लांग* फाटा जातो. तिथं वसलेलं एक चिमुकलं खेडं. गावाच्या वेशीवर गावदेवीचं हेमाडपंथी भव्य मंदिर. इथे या मंदिरात शाळा भरायची. पाचवी ते दहावीपर्यंत वर्ग भरायचे. पुढे शिकायचं तर पुण्याला जावं लागायचं.

आसपासचा परिसर तसा उजाडच. गावाबाहेरून एकच ओढा वाहायचा. पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारा ओढा, उन्हाळा येईतो रोडावत जायचा. रोडावलेल्या ओढ्यात खोदलेलं डबर कसंबसं गावाची तहान भागवायचं. तरी गाव सुखा–समाधानानं नांदत होतं. 'पेर्ते व्हा,' 'पेर्ते व्हा' म्हणून पावशा पक्षी गावावरनं ओरडत गेला की, पावसाळ्याच्या तोंडावर उत्साहानं पेरा व्हायचा. जन्माष्टमीपर्यंत जोंधळ्याची शेतं दुतर्फा डोलू लागायची. नवरात्राच्या आधी कापणी, मळणी, उफाणणी होऊन दसऱ्याला कणग्या तुडुंब भरून राहायच्या. दिवाळीनंतर गहू–हरभरा. शेतात पेरा व्हायचा. थोडीफार मिरची, भाजीपाला उगवायचा. गावातल्या लोहार, कुंभार, सुतार, परीट अशा बलुतेदारांना न कुरकुरता सढळ हातानं दाणे दिले जायचे.

*'ठेविले अनंते तैसेचि राहावे,*
*चित्ती असो द्यावे समाधान.'*

हे गावाच्या हवेत, वाऱ्यात, पाण्यात, मातीत भरभरून होतं!

पण दिवस पालटले. साऱ्या जगाला बदलाची, प्रगतीची ओढ लागली. त्यात या चिमुकल्या गावाची फरफट सुरू झाली. पोरं शिकायला गेली; ती परत यायला काकू करू लागली. गावची गुरं, शेती म्हाताऱ्या खोडांच्या हाती सोपवून शहरात, परदेशात स्थिरावू लागली. पोरांच्या शिक्षणासाठी, पोरींच्या लग्नांसाठी, शेतीवर कर्ज काढून शेतकरी कर्जबाजारी होऊन खंगू लागला. कर्जमाफीसाठी सरकार दरबारी मोर्चे काढू लागला, धरणं धरू लागला.



कर्जमाफीची आश्वासनं मिळायची. मोठमोठ्या नेत्यांची कर्ज माफ व्हायची; आणि लहान शेतकरी बिचारा



**माहिती मिळवा : घुमर – राजस्थान :** हाताच्या हावभावांना पूरक अशा मोहक गोलाकार हालचालींचा समावेश.

वार्षिक प्रायोजक – • श्री. रवी बांडे, शिवापूर, पुणे • एक हितचिंतक, पुणे
• डॉ. महेश बेडेकर, ठाणे

पुन्हा नवं कर्ज घेऊन पुढल्या हंगामाची तयारी करायला लागायचा.

चावडीवर चर्चा घडायला लागल्या.. अल्याड गावात, पल्याड गावात, अलाण्या गावात, फलाण्या गावात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची रांग लागली आणि आत्महत्येची लागण एक दिवस या गावापतूर आली. 'आबा मारणे' या शेतकऱ्यानं गळफास लावून घेतल्याची बातमी चावडीतल्या टीव्हीवर पाहून गाव पार भांबावून गेलं.

आबाचे दोन्ही लेक मस्कत आणि कुवेतकडे चाकरमाने म्हणून गेलेले. आबाचा जावई सैन्यात होता, तो तीन वर्षांपूर्वी शहीद झालेला होता. माघारी आलेल्या लेकीनं सावरण्यासाठी आपलं कॉलेजशिक्षण पूर्ण करून सरकारी नोकरी मिळवली होती. आणि आता ती शहरातच चार वर्षाच्या छोट्या युवराजसोबत राहात होती.

आबाचे श्राद्धसंस्कार करायला तीच पुढं आली. गावाची अवस्था पाहून ती तिथंच राहिली. गावातल्या वडीलमाणसांनी किती समजावलं तिला.

''पोरी, चांगली सरकारी नोकरी सोडू नको. कशाला या गावंढ्या गावात राहायचा हट्ट करतेस? आहे ती जमीन विकून टाक, आबाचं कर्ज फेडून टाक आणि म्हाताऱ्या आईला घेऊन जा बरोबर.''

पोर म्हणाली, ''नाही. ज्यासाठी माझ्या आबांनी जिवंतपणी आपल्या रक्ताचं पाणी केलं, आणि जिच्यासाठी आपले प्राण सोडले, त्या काळ्या आईला विकून टाकू म्हणता? आणि या अवस्थेला कारण कोण? आम्ही मुलंच ना? माझ्या शिक्षणासाठी, एकुलत्या एक पोरीचं लग्न थाटात करण्यासाठी त्यांनी जमिनीवर कर्ज काढलं. भावांना शिकवण्यासाठी आणि परदेशात जाण्यासाठीसुद्धा त्यांनी कर्ज काढून पैसा उभा केला. आज ना उद्या माझे भाऊ गावी परत येतील. मातीची ओढ त्यांना इथे घेऊन येईल. तोवर मी सांभाळीन आबांची जमीन.''

पोरीनं कंबर कसली. पारंपरिक शेती कष्टाची, दीर्घकाळ श्रम मागणारी. आता जगायचं तर काळाची पावलं ओळखली पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने तिने कृषी तंत्रज्ञानातील नवनवीन पद्धतींचा शोध घेतला. सरकारी अनुदाने, शेतीविषयक मार्गदर्शन केंद्राच्या संकेतस्थळावर जाऊन तिने माहिती मिळवली. तिने विचार केला, आपलं गाव तसं अगदी मोक्याच्या ठिकाणी आहे. आपण फूलशेती केली तर आपल्याला मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ शकतो. दसरा दिवाळीला झेंडू, शेवंतीला भरघोस मागणी असते. एरवी शोभेच्या फुलांना मागणी असते.

आबाच्या शेताच्या नऊ एकर जमिनीपैकी अर्ध्या एकरावर पोरीनं *पॉली हाऊस* उभारलं. अल्पावधीत शेवंती, झेंडू यांसारख्या फुलांबरोबरच जरबेरा, ग्लॅडिओला, निशिगंध, जॅकरांडा सारख्या *फॅन्सी* फुलांचंही पीक घ्यायला सुरुवात केली. एका एकरावर फळांसाठी आणि फळभाज्यांसाठी *पॉली हाऊस* उभारलं. *पॉली हाऊस*मुळे हवामान नियंत्रित राखता येतं. कमी पाण्यात वर्षभर फुलं, फळं, भाजीपाला उगवता येतो. थोड्या जागेत भरघोस पीक घेऊन नेहमीपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पैसा मिळवता येतो. उरलेल्या जमिनीत तिनं जोंधळा, गहू आणि हरभरा ही पारंपरिक पिकं घेण्याचं ठरवलं.

फुलांच्या आणि



वार्षिक प्रायोजक – • डॉ. अमित हरताळकर, चोपडा, जि. जळगाव
• कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे

भाजीपाल्याच्या शेतीत कष्ट होते, सारखं सावध राहावं लागत होतं. गावाला पाणी नव्हतं. अख्ख्या गावात दोन चार आड आणि एक दोन विहिरी सोडल्या तर एक ओढा काय तो होता! हिनं आपल्या शेतात *बोअर* घेतलं. खूप पैसा गुंतवायला लागत होता; पण राज्य शासनाकडून अनुदानही होतं आणि मार्गदर्शनही. शिवाय सैनिकाची विधवा म्हणून तिला काही गोष्टी सहज साध्य झाल्या.



गावातल्या शेतकऱ्यांना त्याची कल्पना येत नव्हती. आबाची लेक जास्तच धाडस करतेय, असं वाटून ते काळजीत होते. पण अल्पावधीतच हिच्या शेतात फुलांचे बहर आले. गावात प्रथमच शेतीतील फुलांचं सौंदर्य उमललं. हिनं गावातील आयाबायांना हाती धरून फुलांची तोडणी करणं, त्यांचं अलगद आणि फुलं टिकून राहतील असं *पॅकिंग* करणं अशा कामांना सुरुवात केली. आयाबायांच्या हाताला काम मिळालं. त्यातूनच त्यांचा बचत गटही तयार झाला. नवं वारं गावात फिरू लागलं. गावातले शेतकरी आश्चर्यानं पाहात राहिले.

''ताई आपण, एस.टीची वेळ गाठून माल शहरात पाठवतो, त्याऐवजी आपलाच टेम्पो असता तर..'' चौकसपणे ध्रुपदा विचारती झाली.

''आन चालवणार कोण टेंपो?''

''का वं ताई, आपण नाही चालवू शकत...?''

ताईनं टेम्पोसाठी खटपट केली आणि दारात टेम्पो उभा राहिला. ध्रुपदा गावातली पहिली टेम्पोचालक बनली.

गावाला नवं चैतन्य आलं. दिवसरात्र टेम्पो कधी जेजुरीच्या बाजारात तर कधी सासवडच्या बाजारात, तर कधी शहराच्या *मार्केटयार्डात* जाऊन माल पोहोचवत होता. पहिल्याच तडाख्यात हिला सारा खर्च वजा जाता सात–आठ लाखांचा फायदा झाला. बरोबर काम करणाऱ्या बायकांनाही चांगली आमदनी झाली. घरोघरी यशाची वार्ता पोहोचली.

''ताई, आम्हाला सुद्धा दे की गं तुझा वसा,'' गावाची तरुण पोरं तिच्याकडे आली.

''भावांनो, वसा तुम्हालाही देईन. पण वचनबद्ध व्हा. उतणार नाही मातणार नाही. घेतला वसा टाकणार नाही. समृद्धीबरोबर दारू, गुटखा असली व्यसनं करणार नाही. मोर्चे काढताना दूधदुभतं, भाजीपाला रस्त्यावर ओतून आततायीपणे लक्ष्मीचा अपमान करणार नाही.''

''दिलं ताई, दिलं वचन.'' एकसुरात पोरं म्हणाली. ताईनं



वार्षिक प्रायोजक – • डॉ. कीर्ती आपटे, पुणे • सौ. सारिका फाटक, पुणे • श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे • डॉ. वर्षा बखले, चेंबुर, मुंबई

त्यांना मार्गदर्शन केलं. त्यांच्या मदतीनं गावासाठी जलयुक्त शिवार खोदलं. गावासाठी लागणारं पाणी आता गावच्या अंगणात आलं.आता फळांचा आणि फळभाज्यांचाही बहर आला.

ताई म्हणाली, ''भावांनो, आणखी एक युक्ती आहे. शहराकडे शेतकऱ्यांचे आठवडी बाजार भरतात. कुठल्या भागात, कोणत्या वारी, त्याचा *सर्व्हे* करा. त्यानुसार *टेम्पोनं* गावातल्या तरण्या पोरांनी गावचा माल – अगदी भाजीपाला, फळफळावळ, धान्य, डाळी इ. घेऊन जायचा आणि किरकोळ ग्राहकांना विकायचा. मधल्या अडत्यांना पैसा द्यायची गरज नाही. मिळेल तो पैसा आपलाच असेल.''

गावाला नव्या शेतीचं महत्त्व समजलं. सरकारी योजना गावापर्यंत आल्या. हुरुपानं सारं गाव कामाला लागलं. गावात आता पारंपरिक ज्वारी, बाजरी, गहू, हरभरा या पिकांबरोबर फुलांची किफायतशीर शेती पिकू लागली. पालेभाज्या, फळभाज्या आणि फळंही पिकू लागली. एकाच्या जागी दोन टेम्पो आले आणि नाशवंत माल त्वरित बाजारात पोहोचू लागला. आठवडी बाजारामुळे अडत्यांचा पैसा वाचून शेतकऱ्यांच्या खिशात पडू लागला. तीन-चार वर्षांत आबांनी घेतलेलं कर्ज लेकीनं फेडून टाकलं. आबांच्या आठवणीनं हुंदका दाटला. गावातील शेतकऱ्यांनी तिच्या मार्गावरून चालायचं ठरवलं; तेव्हा सारा गावच कर्जमुक्त होण्याच्या वाटेवर चालू लागला!

गावातच पुढील शिक्षणाची सोय व्हावी असं तिचं स्वप्नं होतं. गावदेवीच्या मंदिरातील शाळा तिने आबांच्या वाड्यात हलवली. आणि सरपंचांशी बोलून गावाच्या शिवेवर महाविद्यालयासाठी जागा घेतली. शेतीच्या बरोबरीनं पोरांना उपयुक्त तंत्रज्ञानाचं शिक्षण देणारी – जिथं सुतारकाम, लोहारकाम, मोचीकाम, अन्नप्रक्रिया व साठवण अशा अनेक विषयांचे वर्ग तिथे चालतील, अशी संस्था तिने सुरू केली. ही संस्था लवकरच जोमात आली. आसपासच्या गावांकडून मुलं तिथे *शॉर्ट कोर्सचे* शिक्षण घेण्यास गर्दी करू लागली. तिचा युवराजही आता गावच्या मराठी शाळेत शिकत होता.

कस्तुरीचा सुगंध फार काळ लपून राहात नाही. वृत्तवाहिन्यांनी तिच्या कामाला आणि तिच्या गावाला सर्वत्र पोहोचवलं. लोक आता हा आदर्श गाव बघण्यासाठी गर्दी करू लागले. अशा प्रवाशांना आकर्षण वाटावं म्हणून मग गावाकडचं खास जेवण, हुळा, हवळा, हुरडा, हरभरा यासारखा रानमेवा मिळेल अशी सोय करण्यात आली. आणखीन नव्या रोजगारांची निर्मिती झाली.

या गावाच्या धडपडीला, जिद्दीला आणि एकोप्यानं काम करण्याला यश आलं. गाव अनेक पुरस्कारांनी गौरवलं गेलं, केवळ मिरवण्यासाठी नाही, तर प्रेरणा घेऊन अशा वाटा गिरवण्यासाठी!

यातून प्रेरणा घेऊन जेव्हा कुणाला 'खेड्याकडे चला' हा बापूजींचा संदेश प्रत्यक्षात आणावासा वाटेल, तेव्हाच ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपन्न झाली, असं म्हणता येईल!!

●●●

**– सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्टमेंट, रस्ता क्र.७,
डहाणुकर कॉलनी, कोथरूड,
पुणे 411038



**माहिती मिळवा : बिहू - आसाम :** हाता-पायांच्या वेगवान हालचालींवर आधारित नृत्य.

वार्षिक प्रायोजक – • श्री. सतीशचंद्र गोरे, पुणे • श्री. विनोद कुलकर्णी, पुणे
• श्री. किशोर पंडित, चेंबुर, मुंबई

# असे घडवले ‘दुर्ग जागर’ मोहिमेने!

- कु. आर्या लिमये



**‘‘प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया,**
**समर्थ मायभूमीला जगी करावया...’’**

वरील ओळीत म्हटल्याप्रमाणेच प्रबोधिनीत आल्यापासून ते आत्तापर्यंतच्या प्रवासात शाळेने मला अनेक गोष्टी भरभरून दिल्या. इथे आमच्यावर घडलेल्या संस्कारांमुळे, योजलेल्या उपक्रमांमुळे आमचं व्यक्तिमत्त्व बहरू लागलं. याच उपक्रमांमधील एक अतिशय आगळावेगळा उपक्रम म्हणजे **‘दुर्ग जागर मोहीम.’** खरंतर, या कल्पनेचं मूळ एका किल्ल्यावर आहे. कोरी गडावरील ट्रेक दरम्यान शिवराजदादाला ही कल्पना सुचली व कालांतराने या कल्पनेचं मोहिमेत रूपांतर झालं. मोहिमेत दादाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले ते गड-किल्ले सेवा समिती चिंचवडचे दोन मुख्य आधारस्तंभ, श्री. निलेश गावडे व श्री. रघुराज एरंडे.

मोहिमेच्या सूचनेचा कागद वर्गावर्गातून फिरला आणि ‘काहीतरी नवीन करायला मिळणार,’ या विचारानेच माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले! मोहिमेच्या निवड प्रक्रियेसाठी आम्हाला एक शारीरिक चाचणी पार करायची होती. त्यानंतर गिर्यारोहणाच्या संदर्भात आमचं अनेक वेळा वेगवेगळ्या प्रकारचं प्रशिक्षण झालं. एका चाचणीतून आम्हाला आमची शारीरिक क्षमता तपासून पाहता आली. त्यानंतर तीन टप्प्यात झालेल्या बारा सत्रांतून आम्ही मोहिमेसाठी सज्ज होत गेलो. यात छायाचित्र काढणे, गडावर असणारे कीटक व प्राणी यांची ओळख, तसेच *ट्रेकिंगसाठी* लागणाऱ्या साहित्याचा परिचय, प्रवासवर्णन कसं लिहावं, गटात काम कसं करावं, गटाचं नेतृत्व कसं करावं अशा एक ना अनेक गोष्टी प्रशिक्षणातून उमजत गेल्या. यामुळे आमच्या ज्ञानात भर पडत होती, त्याच बरोबर अनेक थोरामोठ्यांची नव्याने ओळखी होत होती.

आता खरी सुरुवात झाली आमच्या गिर्यारोहणाला! सुरुवातीला अनेकजणांनी यामध्ये सहभाग घेतला. पण एकोणतीस किल्ले पूर्ण करणं सगळ्यांनाच शक्य झालं नाही. भोरगिरी

## ‘दुर्ग जागर’ मोहिमेविषयी...

हिंदवी स्वराज्याचा इतिहास आपण लहानपणापासून ऐकतो, चौथी व सातवीच्या वर्गात पाठ्यपुस्तकातून अभ्यासतो. शिवाजी महाराजांची रणनीती, त्यांची राजनीती, त्यांचा पराक्रम, स्वराज्य स्थापनेपासून ते स्वराज्य वैभवाप्रत नेणारे महाराजांचे नरवीर या सर्वांचा अभ्यास प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन करता यावा या हेतूने ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयातील इतिहास अध्यापक शिवराज पिंपुडे यांनी एक मोहीम आखली. मोहिमेचे नाव होतं ‘दुर्ग जागर’ आणि **संकल्प होता १० महिन्यात पुणे जिल्ह्यातील २९ किल्ले सर करण्याचा!!**

**सातवी ते नववीतील सुमारे ७२ जणांनी मोहिमेसाठी नोंदणी केली. त्यापैकी ४० विद्यार्थ्यांनी सर्व किल्ले सर केले.** एप्रिल २०१९ मध्ये मोहिमेस सुरुवात झाली व जानेवारी २०२० मध्ये मोहिमेची सांगता झाली. ४० विद्यार्थ्यांपैकी १४ मुली तर २६ मुले होती. २९ पैकी २४ ट्रेक हे रविवारी किंवा अन्य शालेय सुट्ट्यांच्या दिवशी झाले. २९ *ट्रेकमध्ये* मिळून एकूण ८१ पालक सहभागी झाले. याशिवाय ६ पालकांनी मोहिमेसाठी भरपूर कष्ट घेतले.

**मोहिमेत सर केलेले २९ किल्ले –** सिंदोळा, जुन्नर, हडसर, निमगिरी, जीवधन, चावंड, शिवनेरी, नारायणगड, भोरगिरी, चाकण, राजमाची, इंदुरी, विसापूर, लोहगड, अणघाई, मोरगिरी, तुंग, तिकोणा, कोरीगड, घनगड, कैलासगड, सिंहगड, सोनोरी (मल्हारगड), दौलतमंगळ, पुरंदर, तोरणा, राजगड, कावळा, रोहिडा

या किल्ल्याच्या चढाईने आम्ही मोहिमेचं तोरण बांधलं. मुलांबरोबर पालकही यात उत्साहाने सहभागी झाले. काही पालकांनी तर मोहीम शेवटपर्यंत फत्ते करण्याचं ठरवलं. माझ्यासाठी काही चेहरे ओळखीचे तर काही चेहरे अनोळखी होते; पण सगळ्यांशी जुळवून घेऊन पुढे जायचं एवढं मात्र माझे पक्कं ठरलं होतं.

माझा स्वभाव मुळातच अबोल. त्यामुळे सुरुवातीला मी माझ्या गटातील मर्यादित मुलींशीच बोलत असे; पण शिवराजदादांनी माझ्यावर विश्वास दाखवून सुरुवातीलाच मला गटप्रमुख होण्याची संधी दिली. त्या संधीचा उपयोग करून, मला दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण करण्याचं मी ठरवलं. गटप्रमुख असल्याने गटातील प्रत्येक मुलीशी मैत्री करता आली. आमच्यातील संवाद छान वाढत गेला. मी नकळतपणे त्यांची काळजी घेऊ लागले. त्यांच्या समस्या सोडवू लागले. गटप्रमुख होण्याचा हा अनुभव फारच भन्नाट ठरला. यातून मला अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. आपल्यावर एखादी जबाबदारी आल्यास, ती किती निष्ठेने व मनापासून पूर्ण करावी याची जाणीव झाली.

खरंतर, आमच्या या मोहिमेत पालक, शिक्षक व विद्यार्थी अशा सगळ्यांचाच सहभाग होता. जसा प्रत्येकाचा वयोगट वेगळा होता; तशीच प्रत्येकाची शारीरिक क्षमताही भिन्न होती. मीही माझी शारीरिक क्षमता ओळखून, ती वाढविण्याचा प्रयत्न करत होते. सुदैवाने माझ्या शरीरानेही मला साथ दिली. शारीरिक क्षमतेबरोबरच माझी मानसिक शक्तीही वाढत होती. मनात जर खरोखर इच्छा असेल, तर अशक्य गोष्टीही आपण शक्य करू शकतो, याची अनुभूती मला या मोहिमेत आली. राजगड-तोरणा हा सुमारे ३० कि.मी.चा जोड ट्रेक आम्ही दोन दिवसात पूर्ण केला. मधेमधे मी जरा आजारी पडले; पण ट्रेक बुडवण्याचा विचारही माझ्या मनात आला नाही. माझ्या प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मी सर्व ट्रेक पूर्ण केले.



माहिती मिळवा : लावणी - महाराष्ट्र : या लोकनृत्यात शृंगार, वीरता व भक्ती या रसांचा परिपोष.

वार्षिक प्रायोजक – • कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे • एक हितचिंतक, पुणे • सौ. स्मिता चावरे, नवी मुंबई

जशी गटातील मुलींची मैत्री झाली तशीच गटाला नेमून दिलेल्या पालकांशी म्हणजे उदाहरण द्यायचं झालं तर आमच्या शीतलताईंशीही चांगलीच गट्टी जमली. त्या आमच्याशी कधी मैत्रिणीसारख्या गप्पा मारायच्या; तर कधी आईप्रमाणे आमची काळजी घ्यायच्या. काही टप्प्यांवर आम्हीही त्यांना धीर देऊन, त्यांचा उत्साह वाढवून त्यांना पुढे नेत होतो. त्यांच्या हसऱ्या व मनमिळावू स्वभावामुळे, त्या आमच्यातीलच एक झाल्या आहेत!

'दुर्ग जागर मोहिमे'मुळे माझ्यात अनेक बदल घडले. त्यातीलच एक म्हणजे माझ्यातील चिकाटी व आत्मविश्वासामध्ये वाढ झाली. दुर्ग मोहिमेबरोबरच इतर गोष्टी करणंही महत्त्वाचं होतं. त्यांची सांगड घालायला मी शिकले. पहिल्यांदा थोडी धांदल उडाली. थोडा ताण जाणवू लागला. परंतु हळूहळू जसजशी सवय होत गेली, तसं माझं मलाच हे सारं सोपं वाटू लागलं. या दोन्ही गोष्टी पुढे नेताना कलाक्षेत्रातही मी मागे पडले नाही! तिथेही तितक्याच जिद्दीने प्रयत्न करत राहिले व यशही मिळवले. आमच्या या मोहिमेचा इतर कोणत्याही गोष्टींवर परिणाम होऊ द्यायचा नाही, हे मी मनाशी पक्कं केलं होतं. सुदैवाने ते शक्यही झालं. यातूनच माझ्यातील संयम व कष्टाळू वृत्ती वाढली. माझं योजकता कौशल्य सुधारलं. याचा मला माझ्या अभ्यासातही बराच उपयोग झाला.

गडावर भटकंती करताना तिथे ऐकलेल्या इतिहासातून त्याकाळातील व्यक्तींचे काही गुण आत्मसात करण्याचा आम्ही प्रयत्न केला. आम्हाला तिन्ही ऋतुतील निसर्ग अनुभवायची संधी मिळाली. खरोखरच, प्रत्येक वेळी निसर्गात होणारे विविध प्रकारचे बदल आम्ही समजून घेऊ लागलो. निसर्गात फिरल्यामुळे आता मनात कोणतीही भीती शिल्लक राहिली नाही. राजगड-तोरणा जोड ट्रेकच्यावेळी गोठ्यात घालवलेली रात्र तर कधीच विसरू शकणार नाही. निसर्ग जणू काही एखाद्या जवळच्या मित्राप्रमाणेच वाटू लागला आहे. त्यातील प्रत्येक गोष्टीकडे बघण्यासाठी एक वेगळी दृष्टी लाभली आहे. या भटकंतीमुळे माझे मन प्रसन्न होऊन मी जास्तीत जास्त मोकळी झाले व याचा सकारात्मक बदल मला स्वत:ला जाणवला.

कितीही लिहिल्या तरी कमीच पडतील, इतक्या असंख्य गोष्टी या दुर्ग मोहिमेतून मिळाल्या आहेत. सिंहगडावर घेतलेली छायाचित्रणाची स्पर्धा, प्रवासवर्णन लेखनाची स्पर्धा यांमुळे प्रशिक्षणाचे उपयोजन करणं शक्य झालं.

मोहिमेच्या समारोपाच्या कार्यक्रमासाठी दुर्ग अभ्यासक श्री. प्र. के. घाणेकर व एव्हरेस्टवीर श्री. श्रीहरी तापकीर आले होते. त्यांच्या हस्ते आमच्या सर्वांचे मोठे कौतुक करण्यात आले. हा सोहळाही आयुष्यभर लक्षात राहील असा झाला. ही मोहीम कधी संपूच नये, असे प्रत्येकालाच वाटत असणार. परंतु शेवटी ज्या गोष्टीची सुरुवात होते तिला शेवटही असणारच. जरी ही मोहीम संपली, तरी पुढे अशाच अनेक मोहिमा चालूच राहोत हीच ईश्वरचरणी प्रार्थना! शेवटी एवढंच म्हणावंसे वाटते...

*'उसळुनि येता हृदयामधुनी उत्साहाचे झरे ।*
*पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे ।।'*

●●●

- **कु. आर्या लिमये** (इ. ९ वी)
ज्ञान प्रबोधिनी, नवनगर विद्यालय, निगडी, पुणे 411044

पाहूया
'दुर्ग जागर' मोहिमेतील
निवडक क्षणचित्रे



वार्षिक प्रायोजक - • श्री जगजीत कुलकर्णी, चिंचवड , पुणे
• श्री. समीर चावरे, नवी मुंबई • श्री. अनिल रिसबूड, पुणे

## अनुभवसंपन्न आणि अर्थपूर्ण सुट्टीसाठी... व्यक्तिकार्ये (५ वी ते १० वीच्या मुला-मुलींसाठी)

मित्रांनो, यंदा अचानक लवकर मोठी सुट्टी मिळाली, हो नं! ही सुट्टी अधिक अनुभवसंपन्न व अर्थपूर्ण कशी करता येईल? चला तर मग, या सुट्टीत घरच्या घरी आणि आपल्या घरच्यांसाठी काम करण्याचा संकल्प करूया? म्हणजे काय करायचं? खाली दिलेली कामांची यादी वाचा आणि लागा कामाला. काही कामे काही तासांची आहेत, तर काही कामे ८-१० दिवस रोज थोडा-थोडा वेळ करत जाण्याची आहेत. काम पूर्ण झाले, की वहीत दिनांक घालून त्यापुढे ते नोंदवून ठेवा. काम करताना आलेली मजा, झालेली फजिती, मिळालेला नवीन अनुभव इ. गोष्टीही थोडक्यात लिहा. शक्य झाल्यास आपल्या आई-बाबांची त्यापुढे स्वाक्षरी घ्या. आवडली ना कल्पना? नवीन अनुभव घेण्यासाठी या 'व्यक्तिकार्यांचा' तुम्हाला नक्कीच उपयोग होईल. १० कामे खाली दिली आहेत. ही सर्व कामे पूर्ण केलीत तर घरच्यांच्या शाबासकीबरोबरच तुम्हाला 'छात्र प्रबोधन'तर्फे बक्षीसही मिळेल.

१. आई व वडिलांच्या तीन-तीन पिढ्या मागे जाऊन कागदावर किंवा संगणकावर 'कुटुंबवृक्ष' तयार करा. त्या सर्व व्यक्तींचे दोन-तीन वाक्यात परिचय लिहा. शक्य तितक्या व्यक्तींचे फोटो मिळवा.

२. तुमच्या आई-बाबांशी बोलून, चर्चा करून तुमच्या आजी-आजोबांचे किमान दहा पानी चरित्र लिहा.

३. आजी-आजोबा, आई-बाबा हे त्यांच्या लहानपणी खेळत असलेले बैठे खेळ, पळापळीचे खेळ यांची माहिती घ्या आणि ते खेळ समजून घ्या. त्यातील तुम्ही न खेळलेल्या खेळांचे तपशील लिहून काढा व ते खेळ खेळा!

४. घरातील १०-१५ मोठ्या वस्तूंचा (उदा. कपाट, फ्रीज, टिव्ही, वाहने इ) इतिहास नोंदवा. (कधी खरेदी केल्या/भेट मिळाल्या. तेव्हाची किंमत, वस्तूंबाबत विशेष आठवणी इ.) आणि त्यांची 'कालरेषा' तयार करा.

५. नाश्त्याचे पाच पदार्थ शिकून घ्या व घरातल्यांसाठी रोज एक पदार्थ तयार करा.

६. फर्निचर पुसणे, फ्रीज साफ करणे, तुमच्या पुस्तकांचे-कपड्यांचे कप्पे आवरणे, पंखे पुसणे, आपले वाहन पुसणे, जेवणाचे टेबल आवरणे यांसारखी कामे सुट्टीत आवर्जून करा.

७. घर सजावटीसाठी एक कलाकृती स्वत: तयार करा. उदा. तोरण, सिरॅमिक पॉट, वॉल हँगिंग वगैरे.

८. घरातील प्रथमोचाराची पेटी तयार करा. घरात असणाऱ्या औषधांची यादी करा. औषधाचे नाव, त्याचा उपयोग, त्याची *एक्सपायरी* डेट इत्यादी.

९. नारळ फोडणे, लसूण सोलणे, पालेभाजी निवडणे, ताक घुसळणे, कलिंगड आणि फणस ही फळे स्वत: कापणे यांसारख्या किमान ५ कामात आईला नेमाने मदत करा.

१०.पुदिना, कढीपत्ता यांची रोपे लावून ती वाढवा. धने, मेथी यांचे बी पेरून त्यांच्याही वाढीचे निरीक्षण करा.



'पहाटे दव का पडते?' या प्रश्नाला रामूने उत्तर लिहिले.
'देवाला ठाऊक!'
उत्तरपत्रिका तपासून आल्या. त्यात शिक्षकांनी लिहिले होते.
'देवाला पैकीच्या पैकी मार्क! तुला उरलेले शून्य!!'

हास
हास
हास

**पान क्र. १२ वरील कोड्याची उत्तरे –** १) राग २) चपला ३) दादा ४) कसर ५) अंक ६) गंडा ७) कोटी ८) भोग ९) चाळ १०) मान ११) वास १२) सुरा १३) पाव १४) पणती १५) साल १६) अर्थ १७) पालक १८) हार १९) मुका २०) नाडी



**माहिती मिळवा : मोहिनीअट्टम - केरळ** : हे नृत्य नाजूकपणे प्रीतीचा भाव दर्शवते.

वार्षिक प्रायोजक – • सौ. सुमेधा अरूण केळकर, पुणे • श्री. आदित्य मोडक, पुणे • श्री. रवींद्र पालेकर, पुणे

## ‘तुम्हीच संपादक व्हा!’ राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा- परीक्षकांचे मनोगत

छात्र प्रबोधनतर्फे घेतल्या जाणाऱ्या **‘तुम्हीच संपादक व्हा!’** या हस्तलिखित स्पर्धेच्या परीक्षणाची आनंददायी अनुभूती यावर्षी आम्हाला घेता आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या अंतरंगात काही प्रमाणात डोकावता आले. मुलांमधली कल्पकता, सर्जनशीलता आणि आपले हस्तलिखित अधिकाधिक चांगले व्हावे, यासाठी त्यांनी केलेली धडपड या स्पर्धेद्वारे व्यक्त झाली, याचा अनुभव आला. त्यासाठी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम करणे चांगलेच आव्हानात्मक होते. अतिशय उत्तमरित्या सादर केलेल्या या हस्तलिखितांमधून क्रमांक काढणे मुळीच सोपे नव्हते; पण अर्थात मला आणि रंजनाताईंना हे आव्हान स्वीकारणे खूप आवडले.

छात्र प्रबोधनने स्पर्धेसाठी ठेवलेल्या निकषांचे पालन बहुतेक स्पर्धकांनी व्यवस्थित केले होते. मुखपृष्ठ तसेच आतील चित्रं अतिशय सुंदर आणि कल्पकतेने काढली आहेत. संपादकीय लिहिताना हस्तलिखिताबाबतच्या मुलांच्या संकल्पनेचे, उद्देशांचे प्रतिबिंब त्यात व्यवस्थित व स्पष्टपणे उतरलेले पाहावयास मिळाले. गुप्त संदेश देणाऱ्या कविता तर सर्वच गटांनी सुरेख लिहिल्या आहेत. त्यातील काही हस्तलिखितांमधील साहित्य अगदी विशेष नोंद घेण्याजोगे आहे. चित्रांवरून म्हणी, शब्दकोडी, पदार्थांच्या सोप्या कृती, मा. अब्दुल कलाम यांच्या चित्राचे *जिग सॉ पझल* अशा अनेक कल्पक गोष्टी या हस्तलिखितांमधून आम्हाला पाहायला मिळाल्या.

हस्तलिखिताचे शीर्षक ठरवणे, अंतर्गत सजावट, विविध आशयपूर्ण सदरे, नावीन्यपूर्ण पानपूरके इत्यादी अंगांचा विचार ही भावी संपादक मंडळी करत होती, हे छान वाटलं. व्यक्तिपरिचय देताना सरोजिनी बाबर, लोकमान्य टिळक, श्रीराम लागू यांच्याबरोबरच चार्ली चॅप्लिन, अब्दुल कलाम अशा विविध क्षेत्रांतील नामवंतांचा परिचयही मुलांनी करून घेतला असे आढळले.

मुलाखतींच्यामध्ये सर्पमित्र, निवृत्त सैनिक, मसाले उत्पादक, नगरसेविका, स्वत:चे शिक्षक तसेच वडापाव करून प्रसिद्ध झालेली व्यक्ती असे वैविध्य आढळले. जयपूर सहल, सायकलवरची सहल यांची छायाचित्रांसह माहिती आढळली. निर्जीव वस्तूंमधील संवाद या विषयांत पुस्तक-*मोबाईल*, विविध प्रकारचे कप, विविध पादत्राणे, *बॅट-बॉल*, जातं-*मिक्सर*, ढाल-तलवार अशी विविधता होती.

पूरस्थितीचे वर्णन, *डोपिंग*, मुली समाजात सुरक्षित आहेत का? *ट्रान्सजेंडर*, बीजमाता असे सामाजिक विषयही गांभीर्याने हातळलेले आढळले. नाटकाचा स्टेजवर येण्यापर्यंतचा प्रवास असेही वेगळे विषय आढळले. एका विद्यार्थ्याने लिहिलेला होमी भाभा स्पर्धेत बक्षीस मिळवण्याचा अनुभव खूप बोलका होता.

हस्तलिखिताचे नाव आणि मुखपृष्ठ यांच्यातील परस्परसंबंध काही गटांनी योग्यरित्या सांभाळला, तर काही गटांनी त्यात थोडीफार गफलत केली. टाकाऊतून टिकाऊ वस्तूंची यादी देताना आपण त्या वस्तू खरंच बनवू शकणार आहोत का किंवा त्या उपयुक्त होणार आहेत का, याचाही विचार व्हायला हवा होता असे वाटते. अर्थात या गोष्टीचे भान तुम्हाला हळूहळू येईलच.

शुद्धलेखनाच्या बाबतीत मात्र आम्ही काहीशा निराश झालो. शब्दांचे योग्य प्रत्यय, उकार-वेलांट्या, अक्षराचे सुयोग्य वळण या बाबतीत तुम्ही मुले काहीशी मागे पडत आहात. याबाबत अधिक जागरूक राहणे

ग्रीष्माची लाही लाही, शिशिराची थंडी सोसायची असते ।
परी वसंतातल्या मोहोराप्रमाणे, सतत बहरायचेच असते ।।

वार्षिक प्रायोजक – • बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे • श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

आवश्यक आहे. त्यात तुम्ही नक्की सुधारणा कराल याची खात्री आहे. छात्र प्रबोधनच्या या उपक्रमाला तुमच्याकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. असेच उत्साही आणि सर्जनशील राहा, छात्र प्रबोधनच्या विविध उपक्रमांमध्ये सहाभागी व्हा! त्यासाठी तुम्हाला अनेक शुभेच्छा!!

**राज्यस्तरीय स्पर्धेचे परीक्षक – रंजना दाते व मृणालिनी कानिटकर–जोशी**

**छात्र प्रबोधनद्वारा आयोजित**

## राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा निर्णय : २०१९-२०

**(विभागवार झालेल्या स्पर्धेतून अंतिम फेरीतील सहभागी गट - १४)**

**प्रथम क्रमांक :** **'पद्मगंध'** स्व. शेठ रा. कि. लाहोटी कन्या प्रशाला, कराड (सांगली विभाग, प्रथम क्रमांक)

**द्वितीय क्रमांक :** **'व्यक्त लेखणीतून'** आनंद निकेतन शाळा, नाशिक (नाशिक विभाग, प्रथम क्रमांक)

**तृतीय क्रमांक :** **'स्वप्नपूर्ती'** बाल शिवाजी माध्यमिक शाळा, अकोला (पुणे विभाग, प्रथम क्रमांक)

**उत्तेजनार्थ :**
- **'सुमनांजली'** ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, निगडी, पुणे (पुणे विभाग, द्वितीय क्रमांक)
- **'अक्षर शिंपले'** विद्या प्रतिष्ठान, बारामती (बारामती विभाग, प्रथम क्रमांक)
- **'मनातलं कागदावर'** आनंद निकेतन शाळा, नाशिक (नाशिक विभाग, द्वितीय क्रमांक)

### विभागवार झालेल्या स्पर्धेचा निर्णय (७ विभागात मिळून ९१ गट सहभागी)

**१. पुणे** : **तृतीय क्रमांक – 'वाचनामृत'** मॉडर्न हायस्कूल, गणेश खिंड, पुणे

**२. सांगली** : **द्वितीय क्रमांक – 'स्वरयात्री'** सरस्वती विद्यालय, कराड

: **तृतीय क्रमांक – 'स्वयम्'** मालू हायस्कूल, सांगली

**३. अंबाजोगाई** : **प्रथम क्रमांक – 'उमललेली शब्दफुले'** श्रीमती गो. कुं. योगेश्वरी कन्याशाळा, अंबाजोगाई

**४. मालेगाव** : **प्रथम क्रमांक – 'बहार'** तात्यासाहेब सामंत विद्यालय, चाळीसगाव

**५. डोंबिवली** : **प्रथम क्रमांक – 'कलास्पर्श'** टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली

: **द्वितीय क्रमांक – 'स्पंदन'** के. रा. केतकर माध्यमिक विद्यालय, डोंबिवली

**६. नाशिक** : **तृतीय क्रमांक – 'आगळं वेगळं'** रचना विद्यालय, नाशिक

**७. बारामती** : —

स्पर्धेच्या पत्रकात जाहीर केल्याप्रमाणे पारितोषिक म्हणून रोख रक्कम, बक्षिसे (पुस्तकरूपाने), प्रशस्तिपत्रके व गौरवचिन्हे नवीन शैक्षणिक वर्षात शाळेकडे पाठवली जातील.

**सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!**

पाहूया
तृतीय क्रमांकप्राप्त
हस्तलिखित 'स्वप्नपूर्ती'

(राज्यस्तरीय क्रमांकप्राप्त हस्तलिखिते पाहाण्यासाठी/वाचण्यासाठी त्यांचे QR code क्रमश: पुढील अंकांमध्ये दिले जातील.)



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर २६ चैत्र, शके १९४२, १५ एप्रिल २०२० या दिवशी ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

# स्वयं शोध चाचणी १ – वक्तृत्व/भाषण कौशल्य

**या चाचणीतील प्रश्नांचे उत्तर देताना, नेहमीच /कधीतरी /क्वचित /कधीच नाही यांपैकी कोणतातरी एक पर्याय निवडा आणि त्यासाठी खालील गुण देण्याच्या पद्धतीनुसार त्या प्रश्नांपुढे गुण द्या. हे काम प्रामाणिकपणे करा.**

| प्रश्न | गुण देण्याची पद्धत – नेहमीच – ४ , कधीतरी – ३, क्वचित – २ , कधीच नाही – १ | गुण |
|---|---|---|
| १) | भाषण करताना मला आत्मविश्वास वाटतो का? | |
| २) | भाषण करताना माझे उच्चार स्पष्ट असतात का? | |
| ३) | भाषणातील आशयानुसार माझ्या आवाजात मी चढउतार करते/करतो का? | |
| ४) | भाषण करताना माझ्या बोलण्याचा वेग आशयानुसार मी कमी-जास्त करते/करतो का? | |
| ५) | विरामचिन्हांनुसार योग्य ठिकाणी विराम/थांबा घेत घेत मी भाषण चालू ठेवते/ठेवतो का? | |
| ६) | भाषण करताना मी श्रोत्यांकडे बघून बोलते/बोलतो का? | |
| ७) | भाषण करताना आशयाशी सुसंगत देहबोलीचा (हातवारे, हावभाव, हालचाली, उभे राहण्याची पद्धत इ.) वापर मी करते/करतो का? | |
| ८) | भाषण करताना माझ्या शरीराच्या अनावश्यक हालचाली मी टाळतो/टाळते का? | |
| ९) | ५० पेक्षा अधिक श्रोत्यांसमोर मी सहजपणे बोलू शकतो/शकते का? | |
| | **एकूण** | |

*** टीप – ही चाचणी विद्यार्थ्यांना स्वपरीक्षणासाठी उपयोगी पडावी, या हेतूने तयार केली असून ती परिपूर्ण व प्रमाणित नाही.**
**या चाचणीतील कौशल्य विकसित होण्यासाठी, चाचणीतील एकूण गुणांनुसार काही कृतींची यादी आम्ही केली आहे. ती समजून घेण्यासाठी या ७७७४९६९६२३ भ्रमणभाषवर व्हॉटस्अ‍ॅप/संदेश पाठवा. त्यामध्ये पुढील मजकूर असावा.**
**(छात्र प्रबोधन/स्वयंशोध चाचणी – १/ वक्तृत्व भाषण कौशल्य/पूर्ण नाव/गाव/इयत्ता/चाचणी गुण/मोबाइल क्रमांक) म्हणजे तुमच्या गुणांनुसार, तुम्ही कोणत्या कृती केल्याचा उपयोग होईल, त्या कृती तुम्हाला कळवण्यात येतील. त्या कृती तुम्ही आवर्जून करा व स्वत:तील क्षमता विकसित करा.**

## प्रतिसादी वाचकवीर व्हा... (वर्ष २०/७)

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

**या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ मे २०२० पर्यंत 'छात्र प्रबोधन'ला मेल करून कळवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी! या निमित्ताने तुम्ही अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.**

**प्रश्नांची उत्तरे लिहा –** १) 'खरे स्वच्छतादूत कोण,' असे तुम्हाला वाटते?

२) बोलताना भाषा कशी असावी, असे कवीला वाटते? (सदर्भ : कविता – अशी बोलावी रे भाषा)

३) बाळसेदार गऱ्यांनी भरलेल्या फणसाचा कोणता पदार्थ लेखिकेच्या सासूबाईंनी आनंदाने केला? (संदर्भ : फणसायन)

४) 'कहाणी एका जिद्दीची' या कथेत आबाच्या लेकीचे कोणते गुण तुम्हाला भावले? का?

५) आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश, आसाम, राजस्थान या राज्यांमध्ये केल्या जाणाऱ्या नृत्य प्रकारांची नावे लिहा.

६) 'दुर्ग जागर मोहिमे'त एकूण किती किल्ले सर करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला? त्यापैकी किमान ३ किल्ल्यांची नावे लिहा.

७) विषाणूला 'कोरोना' हे नाव कशामुळे मिळाले?


८) संवाद या संपादकीय लेखामधील ५ महत्त्वाचे मुद्दे लिहा.



**माहिती मिळवा : छाऊ - ओडिसा :** आदिवासी आणि लोकपरंपरेतून आलेला शास्त्रीय नृत्यप्रकार.

# बोलके ते चेहरे जे प्रांजळाचे आरसे!

**सोबत काही चेहरे दिले आहेत. वेगवेगळ्या वेळी आपली/इतरांची मन:स्थिती कशी आहे, हे ओळखण्यासाठी त्यातील भावाशी आपल्या/इतरांच्या चेहऱ्यावरचा भाव पडताळून पाहा आणि आपली/इतरांची मन:स्थिती ओळखा.**



सौर चैत्र, शके १९४२/एप्रिल २०२० पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर २६ चैत्र, शके १९४२/१५ एप्रिल २०२०
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR /2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (SDM/Pune/SR/139/2017)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2018-2020
Date of posting : 1-4- 2020, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-4-2020

सौर दिनदर्शिका शके १९४२

| | एप्रिल २०२० | चैत्र वैशाख |
|---|---|---|
| बु. | 1 | चै.१२ |
| गु. | 2 | १३ |
| शु. | 3 | १४ |
| श. | 4 | १५ |
| र. | 5 | १६ |
| सो. | 6 | १७ |
| मं. | 7 | १८ |
| बु. | 8 | १९ |
| गु. | 9 | २० |
| शु. | 10 | २१ |
| श. | 11 | २२ |
| र. | 12 | २३ |
| सो. | 13 | २४ |
| मं. | 14 | २५ |
| बु. | 15 | २६ |
| गु. | 16 | २७ |
| शु. | 17 | २८ |
| श. | 18 | २९ |
| र. | 19 | ३० |
| सो. | 20 | ३१ |
| मं. | 21 | वै. १ |
| बु. | 22 | २ |
| गु. | 23 | ३ |
| शु. | 24 | ४ |
| श. | 25 | ५ |
| र. | 26 | ६ |
| सो. | 27 | ७ |
| मं. | 28 | ८ |
| बु. | 29 | ९ |
| गु. | 30 | १० |



राजगड-तोरणा जोड *ट्रेकच्यावेळी* तोरण्याकडे जाताना *मोबाईल* (mi 6 pro) मधून काढलेले छायाचित्र. समोर तोरणा किल्ल्याची बुधला माची व सुळका दिसत आहे.

**प्रकाशचित्र – शिवराज पिंपुडे,** shivraj.pimpude@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिनकोड क्रमांक नसल्यास तातडीने कळवा. | सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**ई-मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत :** ₹ २०
**वार्षिक वर्गणी :** ₹ २००

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन